सुधारित मसुदा / Revised Draft

# महाराष्ट्र राज्यासाठी ठोक पाणीप्रशुल्क निर्धारणाचे निकष

## (सन २०१३ – १६)

## महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण

नोव्हेंबर - २०१३

# महाराष्ट्र राज्यासाठी ठोक पाणी प्रशुल्क निर्धारणाचे निकष (सन २०१३-१६)

## १.० पार्श्वभूमी :

१.१ महाराष्ट्र राज्यातील जलसंपत्तीचे विनियमन करण्याकरिता, जलसंपत्तीचे कुशल समन्यायी व शाश्वत व्यवस्थापन वाटप व वापर सुकर करण्याकरिता आणि त्याची सुनिश्चिती करण्यासाठी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (मजनिप्रा) अधिनियम, २००५ (यापुढे 'अधिनियम' म्हणून संबोधण्यात येईल) करण्यात आला. राज्य शासनाने राजपत्र अधिसूचना क्र.समिती २००५/(७२/०५)/१/ डब्ल्यूआरआय, दि. ८/६/२००५ च्याद्वारे त्याच दिनांकाला अधिनियम लागू केला. अधिसूचना क्र. मजनिप्रा निवड २००५/७८/०५, दि.१२/८/२००५ द्वारे अधिनियमात नमूद केलेली प्रयोजने पार पाडण्याकरिता यथावकाश मजनिप्राची (यापुढे 'प्राधिकरण' म्हणून संबोधण्यात येईल) स्थापना केली.

१.२ प्राधिकरणाच्या अधिकार, कार्ये आणि कर्तव्ये याचा एक भाग म्हणून (कलम ११ (घ) नुसार) लाभार्थी जनतेच्या मतांची खात्री करुन घेतल्यानंतर जलसंपत्ती प्रकल्पांच्या सिंचन व्यवस्थापनाच्या प्रशासकीय कार्यचालन व परिरक्षणाच्या संपूर्ण खर्चाची वसुली परावर्तीत होईल अशा तऱ्हेने पाण्याची दर (जलप्रशुल्क) पध्दती ठरविणे आणि उपखोरे, नदी-खोरे आणि राज्यस्तरावरील पाणीपट्टी आकारण्याचे निकष ठरविणे हे प्राधिकरणाचे एक कार्य आहे.

१.३ अधिनियमातील कलम ११ (प) नुसार प्राधिकरणाने दर तीन वर्षांनी पाणीपट्टीचे पुनर्विलोकन व पुनरीक्षण करणे आवश्यक आहे.

१.४ कलम ११ (घ) मधील तरतुदींचे पालन करताना प्राधिकरणाने जून २०१० मध्ये लाभार्थींसमवेत तपशीलवार सल्लामसलत प्रक्रिया आणि जनसुनावण्या पार पाडून २०१०-१३ या तीन वर्षांच्या कालावधीकरिता ठोक पाणी प्रशुल्क ठरविण्याचे निकष निश्चित केले होते. जलसंपदा विभागाने या निकषांवर आधारित कृषी, घरगुती आणि

औद्योगिक अशा तीन प्रवर्गातील पाणी वापर कर्त्यांसाठी घनमापन पध्दतीचे ठोक जलदर आणि कृषी वापरासाठी क्षेत्राधारित दराबाबतच्या प्रस्तावाचा मसुदा तयार केला. प्राधिकरणाने, सदर प्रस्ताव निकषांशी सुसंगत असल्याची खात्री करुन, त्याची तांत्रिक छाननी केली आणि लाभार्थीसमवेत आवश्यक ती सल्लामसलत करुन तो प्रस्ताव अंतीम केल्यानंतर तीनही प्रवर्गातील ठोक पाणी वापरकर्त्यांसाठी दि. ३०/५/२०११ चा घनमापन दराबाबतचा आदेश प्रसृत केला. प्राधिकरणाने विविध पिकांसाठी क्षेत्राधारित पाणी पुरवठयाच्या दर प्रस्तावाला सुध्दा मान्यता दिली आणि त्याबाबतचे आदेश जलसंपदा विभागाने दि. २९/६/२०११ च्या शासन निर्णयाद्वारे निर्गमित केले. हे दोनही आदेश रबी २०१०-११ ते उन्हाळी २०१२-१३ या कालावधीसाठी लागू झाले.

१.५ सन २०१०-१३ च्या निकषातील निकष क्र. ३ नुसार या निकषांचा विधीग्राहयता कालावधी तीन वर्षांचा म्हणजेच जून २०१३ अखेर पर्यंतचा आहे. या निकषामध्ये आणखी अशीही अट आहे की त्या नंतरच्या नियत्रंण कालावधीसाठी ठोक जलदराचा आढावा व सुधारणा करण्यापूर्वी आवश्यकतेनुसार ठोक जलदर निर्धारणाच्या निकषांचे पुनर्विलोकन व पुनरीक्षण तत्संबंधीच्या विनियमातील तरतुदीनुसार करण्याचे काम प्राधिकरण हाती घेईल.

१.६ ‘महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (ठोक जलप्रशुल्क निर्धारणाकरिता निकषांचे निश्चितीकरण व आदेश काढणे) विनियम २०१०’ या नांवाने असलेल्या ठोक पाणी प्रशुल्क निश्चिती च्या विनियमांना जलसंपदा विभागाने दि. १० मे २०१२ रोजी मान्यता दिली.

१.७ ***या पूर्वी प्रसिध्द केलेल्या दृष्टिनिबंध २०१३-१६ व मसुदा निकष २०१३-१६ यावर प्राप्त झालेल्या विविध लाभार्थींचे / अशासकीय संघटनांचे (सोपेकॉम, प्रयास, गोमुख आणि लोकाभिमूख पाणी धोरण संघर्ष मंच इ.) प्रमुख अभिप्राय खालीलप्रमाणे -***

*(१) निकष अंतिम करण्यापूर्वी पूर्वीच्या दरांच्या प्रभावाचा अभ्यास करण्यात यावा.*

*(२) खर्च विभागणी तक्त्यामधील निवडलेल्या घटकांचे आणि त्यांच्या टक्केवारीचे तर्कसंगतरित्या पुनर्विलोकन करण्यात यावे.*

*(३) राज्यातील शासकीय उपसासिंचन योजनांचे दर ठरविताना राज्याच्या देखभाल-दुरुस्तीच्या एकूण खर्चामध्ये उपसासिंचन योजनांच्या देखभालीचा खर्च मिळवून दर ठरवावेत.*

*(४) राज्यातील कालवे प्रणालीच्या वहनव्ययाचे नेमके परिमाण किती आहे याबाबत अभ्यास करण्यात यावा.*

*(५) खर्चविभागणी तक्त्यांमधील घटकांमध्ये पाण्याच्या गुणवत्तेबाबतचा घटक समाविष्ट करावा.*

*त्यामुळे प्राधिकरणाने मसुदा निकषावर जनसुनावण्या घेण्यापूर्वी 'पूर्वीच्या दराच्या प्रभावाचा अभ्यास' आणि 'खर्चविभागणी तक्त्याचा अभ्यास' त्रयस्थ सल्लागाराकडून करुन घेण्याचा निर्णय घेतला व त्यासाठी अनुक्रमे 'सोपेकाम, पुणे' आणि 'मे.इदम इन्फ्रास्ट्रक्चर ॲडव्हायजरी लि., मुंबई ' यांची रितसर नेमणूक करुन हे अभ्यास केले.*

*या दोन्ही अभ्यासांकरीता आणि राज्यातील शासकीय उपसासिंचन योजनांकरीता जलसंपदा विभागाकडून आवश्यक माहिती गोळा करण्यात आली. शासकीय उपसासिंचन योजनांचे वार्षिक परिरक्षण व दुरुस्ती व उर्जा खर्चाचे दायित्वाबाबत शासनाचे अभिप्राय मिळविले.*

*वहनव्ययाच्या परिमाणाबाबत वाल्मी, औरंगाबाद या संस्थेकडे शासनाने अभ्यास सोपविला आहे. याकरीता विविध विभागातील १२ मोठे, मध्यम व लघू प्रकल्प निवडून त्यातील कालव्यांच्या नमुन्यादाखल काही भागावर निरीक्षणे घेऊन हा अभ्यास २०१०-११ व २०११-१२ या वर्षी करण्यात आला. वहनव्ययाबाबत सर्वसाधारण निष्कर्ष काढण्यापूर्वी किमान ३ वर्षे ही निरीक्षणे घेणे आवश्यक असल्यामुळे २०१३-१४ पर्यंत हा अभ्यास पूर्ण करण्याचे नियोजित आहे.*

*खर्चविभागणी तक्त्यातील निवडलेल्या घटकांमध्ये पाण्याच्या गुणवत्तेबाबतचा घटक समाविष्ट करण्याबाबत मे.इदम इन्फ्रास्ट्रक्चर यांनी केलेल्या अभ्यासात हा विषय अंतर्भूत केला आहे. सोपेकॉम आणि इदम यांनी केलेल्या दोनही अभ्यासांचा तपशील प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येत आहे. वर नमुद केलेल्या अभ्यासाच्या पार्श्वभूमीवर यापूर्वी तालुका पातळीवर उपलब्ध केलेला निकषाचा मसुदा आता सुधारित करण्यात आला आहे. हा सुधारित मसुदा पुन्हा तालुका पातळीवर उपलब्ध करुन त्यावर जनसुनावण्या आयोजित करण्याचे प्रस्तावित आहे.*

## २.० व्याख्या:

(क) **"कृषि वापरकर्ता"** याचा अर्थ राज्यातील ज्या पाणीवापर संस्थांना तिच्या सभासदांना वितरित करण्याकरिता ठोक पाणी पुरवठा केला जातो अशी जलाशय/ कालवा /वितरिका/लघु वितरिका स्तरावरील प्रवाही अथवा उपसा संस्था किंवा जेथे पाणीवापर संस्था स्थापन झाली नसेल किंवा स्थापन होऊन कार्यान्वित झाली नसेल तेथे ज्यास पीकवाढीसाठी प्रकल्प अधिकाऱ्यांकडून पाणी पुरविले जाते, असा वैयक्तिक शेतकरी.

(ख) **"अनुज्ञेय दर"** म्हणजेच पुरवठयाचा स्त्रोत / हंगाम इत्यादीवर आधारीत आणि जो मूळ दरास निकषातील योग्य गुणक लावून काढला जाईल असा अनुज्ञेय दर.

(ग) **"मूळदर"** (पायाभूत दर) हा कोणत्याही प्रवर्गासाठीच्या वापरदारासाठी ***आश्वासीत पाणी पुरवठयाचे स्त्रोताकरीता*** रबी हंगामासाठीचा लागू असलेला घनमापन पध्दतीचा दर असा आहे.

(घ) **"ठोक जल"** याचा अर्थ जलसंपदा विभागाने अथवा पाटबंधारे विकास महामंडळाने बांधलेल्या व त्यांच्याद्वारे प्रचालन करण्यात येत असलेल्या राज्यातील जलाशयामधून/कालवे प्रणालीमधून प्रवाही अथवा उपसा पध्दतीने कृषी/घरगुती/औद्योगिक वापरकर्त्यांना पुरविलेले पाणी किंवा जलसंपदा विभाग/पाटबंधारे विकास महामंडळ यांनी अशा वापरकर्त्यांना राज्यातील नियंत्रित नद्या आणि त्यांच्या उपनद्यांमधून अथवा नैसर्गिक पाणीसाठे, तलाव यामधून प्रवाही अथवा उपसा पध्दतीने वापरण्यास उपलब्ध केलेले पाणी होय. तसेच यामध्ये पाणीवापरकर्ते/ उद्योग यांचेकडून बांधण्यात व प्रचालन करण्यात येणाऱ्या जलाशयामधून घेतलेले पाणी अथवा नैसर्गिक पाणीसाठे, तलाव यामधून त्यांचे स्वखर्चाने बांधलेल्या आणि प्रचालन करण्यात येणाऱ्या बांधकामातून प्रवाही अथवा उपसा पध्दतीने घेतलेले पाणी याचा सुध्दा समावेश आहे.

(च) **"ठोक जल दर"** याचा अर्थ आकारणीच्या वेळी लागू असलेल्या प्राधिकरणाने निर्गमित केलेल्या घनमापन पध्दतीच्या जलदरासंबंधीच्या आदेशानुसार जलसंपदा विभागाने ठोक पाणीवापर कर्त्यांना आकारलेला दर.

(छ) **"वसुलीची कार्यक्षमता"** याचा अर्थ, थकबाकी वगळता, ठोक पाणी वापरकर्त्यांकडून एखाद्या वर्षी प्राप्त झालेला महसूल व त्यावर्षी केलेली जलदराची आकारणी याचे गुणोत्तर होय.

(ज) **"नियंत्रण कालावधी"** याचा अर्थ जल दर लागू करण्यासाठीचा कालावधी, म्हणजेच १ जुलै २०१३ ते ३० जून २०१४, १ जुलै २०१४ ते ३० जून २०१५ व १ जुलै २०१५ ते ३० जून २०१६ या तीन सलग जल वर्षाचा कालावधी होय.

(झ) **"लागवडीलायक क्षेत्र"** म्हणजे योजनेचे असे क्षेत्र की ज्यावर सिंचन प्रकल्पांद्वारे सिंचन करता येईल व ते लागवडीसाठी योग्य असेल.

(त) **"घरगुती वापरकर्ते"** याचा अर्थ ज्यांना जलसंपदा विभागाने / पाटबंधारे विकास महामंडळाने घरगुती वापरासाठी प्रक्रियारहित ठोक पाणी उपलब्ध केले आहे असे वापरकर्ते (ग्रामपंचायत, नगरपालिका, महानगरपालिका, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ).

(थ) **"पाणी टंचाई/आपत्ती"** - एखाद्या जलसंपत्ती प्रकल्पातील पाणी टंचाई म्हणजे जेव्हा उपयुक्त पाणी साठयाची १५ ऑक्टोबर रोजीची असणारी प्रत्यक्ष उपलब्धता त्या प्रकल्पाच्या संकल्पित उपयुक्त साठयाच्या ३३ % पेक्षा कमी असेल अशी स्थिती

(द) **"अवर्षण"** म्हणजे राज्य शासनाने 'अवर्षण' म्हणून जाहीर केलेला असा कालावधी की, ज्यांत पीकवाढीच्या हंगामात जेव्हा मातीची आर्द्रता व पर्जन्यमान पिकाच्या निरोगी वाढीसाठी अपुरे ठरते व त्यामुळे पिकांवर ताण येवून त्याची वाढ खुंटते.

(ध) **"ऊर्जा भार"** याचा अर्थ पाण्याच्या वापराकरिता परवानाधारक वीज वितरण संस्थेकडून ठोक जल वापरकर्त्यांच्या विविध प्रवर्गावर पाणी उचलण्यासाठी लावण्यात येणारा वीज आकार, असा होय.

(न) **"उन्हाळी"** याचा जलदरापुरता अर्थ, १ मार्च ते ३० जून पर्यंतचा हंगाम अथवा राज्य शासनाने अधिसूचित केलेला हंगाम. कोकण, मराठवाडा आणि विदर्भ प्रदेश करिता हा हंगाम १ एप्रिल ते ३० जून असेल.

(ट) **"औद्योगिक वापरकर्ते"** ह्याचा अर्थ कच्चा माल (उदा. शीतपेय) म्हणून अथवा उत्पादन प्रक्रियेसाठी (उदा. तापमान कमी करणे, स्वच्छता इ.) जलसंपदा

विभागाकडून / पाटबंधारे विकास महामंडळाकडून उपलब्ध केलेल्या पाण्याचा वापर करणारे उद्योग (सेझ, सहकारी औद्योगिक वसाहत औद्योगिक विकास महामंडळासह).

(ठ) **"खरीप"** याचा जलदरापुरता अर्थ कोकण, मराठवाडा व विदर्भ वगळता १ जुलै ते १४ ऑक्टोबर पर्यंतचा हंगाम आणि मराठवाडा व विदर्भासाठी १ जुलै ते १४ नोव्हेंबर पर्यंतचा हंगाम ***आणि कोकण करीता १ जुलै ते १४ डिसेंबर पर्यंतचा हंगाम होय.***

(ड) **"मोठे, मध्यम व लघु पाटबंधारे प्रकल्प"** याचा अर्थ अनुक्रमे १०,००० हेक्टरपेक्षा अधिक, २००० ते १०,००० हेक्टर या दरम्यान आणि २००० हेक्टरपेक्षा कमी, लागवडीलायक क्षेत्र असलेला प्रकल्प असा होय.

(ढ) **"आधुनिक सिंचन पध्दती"** याचा अर्थ सूक्ष्म-सिंचन (ठिंबक व तुषार) किंवा प्राधिकरण वेळोवेळी विनिर्दिष्ट करील अशी कोणतीही अन्य पध्दती असा होय.

(ण) **"प्रचालन व परिरक्षण (ओ अँड एम्) खर्च"** याचा अर्थ आस्थापना खर्च व जलसंपत्ती प्रकल्पाच्या सिंचन प्रणालीवर प्राधिकरणाने वेळोवेळी ठरविलेल्या मानकानुसार आणि संबंधित शासन निर्णय विचारात घेऊन येणारा देखभाल व दुरुस्तीचा एकूण खर्च होय.

(प) **"रबी"** याचा जलदरापुरता अर्थ कोकण आणि विदर्भ वगळता १५ ऑक्टोबर ते २८ फेब्रुवारीपर्यंतचा हंगाम आणि ***मराठवाडा*** व विदर्भाकरिता १५ नोव्हेंबर ते ३१ मार्च पर्यंतचा हंगाम ***आणि कोकणसाठी दि.१५ डिसेंबर ते ३१ मार्च पर्यंतचा हंगाम*** असा होय.

(फ) **"राज्य"** याचा अर्थ, महाराष्ट्र राज्य असा आहे.

(ब) **"लाभार्थी / हितसंबंधी"** म्हणजे कोणताही ठोक पाणी वापरकर्ता अथवा हक्कदारी धारक अथवा या पैकी कोणाही एकाचा अधिकृत प्रतिनिधी असणारी नोंदणीकृत संस्था.

***(भ) "पाण्याची गुणवत्ता" याचा अर्थ घरगुती व औद्योगिक पाणीवापरकर्त्यांनी त्यांचे सांडपाणी नैसर्गिक नदी/नाले पात्रात सोडण्यापूर्वी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने विहित केलेल्या मापदंडानूसार असलेली गुणवत्तेची मर्यादा.***

## ३.० सन २०१३-१६ चे निकष

### ३.१ *निकष अंतिम करण्यासाठी अवलंबावयाची कार्यपध्दती* -

हे निकष तयार करताना, राज्य जलनीती २००३, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम २००५, महाराष्ट्र सिंचन पध्दतीचे शेतकऱ्यांद्वारे व्यवस्थापन अधिनियम २००५ यामधील संबंधित तरतुदी तसेच ठोक पाणी प्रशुल्क निर्धारणाचे निकष ठरविण्याकरिता प्राधिकरणाने मार्च २०१२ मध्ये तयार करुन लाभार्थी / हितसंबंधींना उपलब्ध केलेल्या दृष्टीनिबंध २०१३-१६ वरील प्राप्त अभिप्राय / सूचना यांचा विचार केला आहे.

३.२ सन २०१३-१६ करिता निकषाचे पुनरीक्षण 'महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (ठोक जलप्रशुल्क निर्धारणाकरिता निकषांचे निश्चितीकरण व आदेश काढणे) विनियम २०१०' या विनियमातील कार्यपध्दतीनुसार केलेले आहे.

विनियमात दिलेली कार्यपध्दती अशी आहे -

(१) लाभार्थीसमवेत सल्लामसलतीकरिता इंग्रजी व मराठीत दृष्टीनिबंध (ॲप्रोच पेपर) तयार करणे.

(२) राज्य शासनाचे संबंधित विभाग, जलक्षेत्राशी संबधित अशासकीय संघटना, पाणी वाटपाची कार्यवाही करणाऱ्या सार्वजनिक संस्था आणि जलक्षेत्रातील तज्ञ यांचेकडे दृष्टीनिबंधाचा मसुदा पाठविणे. प्राधिकरणाने हा दृष्टीनिबंध प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर (वेबसाईटवर) ठेऊन लाभार्थीजनतेचे आणि संघटना / गट/ मंच / निगमनिकाय, ठोक पाणीवापरकर्ते यांचे अभिप्राय / सूचना सुध्दा मागवावयाच्या आहेत. वरील कृतीव्यतिरिक्त प्राधिकरण सदर दृष्टीनिबंधाच्या प्रती राज्यातील सर्व तालुका मुख्यालयांमध्ये (जलसंपदा उपविभाग अथवा पंचायत समिती कार्यालये) याबाबत जिल्हयातील प्रमुख मराठी वृत्तपत्रामध्ये योग्य ती प्रसिध्दी देऊन उपलब्ध करुन देईल.

(३) दृष्टीनिबंधाच्या मसुद्यावर प्राप्त झालेल्या लेखी अभिप्राय / सूचनांच्या सामायिक मुद्यांची यादी तयार करुन ती प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर (वेबसाईटवर) ठेवणे.

(४) ठोक पाणी प्रशुल्क निर्धारणासाठी निकषांचा मसुदा तयार करणे आणि तो प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर (वेबसाईटवर) ठेवणे.

(५) लाभार्थींच्या मतांची खात्री करुन घेण्याकरिता सर्व महसूल विभागीय मुख्यालयांच्या ठिकाणी प्राधिकरणामार्फत निकषांच्या मसुद्यावर जनसुनावणी घेणे.

३.३ लाभार्थींशी सल्लामसलत करण्यासाठी वर दिलेली कार्यपध्दतीस अनुसरुन हा निकषाचा मसुदा तयार केला आहे. शिवाय जिल्हा आकाशवाणी केंद्रे आणि दूरदर्शन वृत्तवाहिन्या यांच्या माध्यमातून सदर दृष्टिनिबंध सर्व तालुक्याच्या ठिकाणी उपलब्ध असल्याचे निवेदनही केले होते.

***३.४ वरील परिच्छेद १.७ मध्ये नमूद केल्यानुसार लाभार्थींच्या सल्लामसलतीमध्ये पाण्याच्या गुणवत्तेवरील परिणामाचा अभ्यास, कालव्यातील वहनव्यय, पूर्वीच्या दराच्या प्रभावाचा अभ्यास, वापरांच्या***

*वर्गवारीमध्ये करावयाचा खर्च विभागणी तक्ता (Cost Allocation Matrix), शासकीय उपसा सिंचन योजनांचे दर, इत्यादीबाबत आणखी अभ्यास करावयाची गरज लक्षात घेऊन प्राधिकरणाने सुधारित मसुदा निकष तयार करुन त्यानंतर वरील ३.२ (५) नुसार जनसुनावणी घ्यावयाचे ठरविले. यासाठी लागणारा तपशील गोळा करणे व सदर अभ्यास करुन सुधारित मसुदा निकष तयार करावायाचा कालावधी विचारात घेऊन प्राधिकरणाचे पत्र क्र.४३० दि.२९/०६/२०१३ नुसार व शा.नि.दि.१४/८/२०१३ नुसार पूर्वीच्या (२०१०-१३ च्या) दरास आणखी १ वर्ष म्हणजेच ३०/०६/२०१४ पर्यंत तात्पुरती मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे या निकषांनुसार २०१३-१६ कालावधीचे होणारे दर १/७/२०१३ पासून अनुज्ञेय ठरतील.*

## ४.० निकषांची अनुज्ञेयता :

राज्यातील पाचही विकास महामंडळांचे नदी खोरे अभिकरणामध्ये म्हणजे खोरे आधारित महसूल स्त्रोत असणाऱ्या स्वतंत्र आर्थिक संघटना मध्ये अद्याप परिवर्तन झालेले नसल्यामुळे यापूर्वीच्या निकषांप्रमाणे हे निकष सुध्दा राज्यस्तरावरील सर्व नदी खोरे अभिकरणांस ***म्हणजेच पाटबंधारे विकास महामंडळांस*** एकच पाणी प्रशुल्क रचना अनुज्ञेय राहील.

## ५.० निकषांची विधीग्राह्यताः

निकषाचा विधिग्राह्य कालावधी तीन वर्षांकरिता राहील व हे निकष जून २०१३ ते ३० जून २०१६ पर्यंतच्या नियंत्रण कालावधीस आणि त्या नंतरच्या प्राधिकरण

ठरविल त्या कालावधीसाठी सुध्दा लागू राहतील. निकषांचे पुनर्विलोकन व पुनरीक्षण करण्यापूर्वी तत्संबंधी विनियमातील तरतुदींनुसार प्राधिकरण कार्यवाही करील.

## ६.० पाणी प्रशुल्क आदेश निर्गमित करण्यासाठी अनुसरावयाची कार्यपध्दतीः

६.१ प्राधिकरण ठोक पाणी प्रशुल्क निर्धारणाचे निकष निश्चित केल्यावर जलसंपदा विभागाकडे पाठविल व जलसंपदा विभाग त्यानुसार सन २०१३-१६ करिता ठोक पाणी प्रशुल्क प्रस्तावाचा मसुदा तयार करुन तो तीन महिन्यात प्राधिकरणाकडे पाठविल.

६.२ जलसंपदा विभाग, ठोक पाणीप्रशुल्क निर्धारणासाठीच्या निकषात विहित केलेल्या पध्दतीनुसार आणि दृष्टीनिबंधात प्रस्तुत केलेल्या माहितीचा वापर करुन उद्योग आणि घरगुती वापरासाठी घनमापन आणि कृषीसिंचनासाठी घनमापन तसेच क्षेत्रधारित दर याचा प्रस्तावाच्या मसुद्यात समावेश असेल असे पाहिल.

६.३ जलसंपदा विभागाकडून प्रशुल्क प्रस्तावाचा मसुदा प्राधिकरणास प्राप्त झाल्यावर तो ठोक पाणीप्रशुल्क निर्धारणाच्या निकषाशी सुसंगत असल्याची व आधारभूत माहितीची वैधता याची प्राधिकरण तांत्रिक तपासणी करेल. प्राधिकरण आवश्यकतेनुसार जलसंपदा विभागाकडून खुलासा मागवेल.

६.४ प्रशुल्क प्रस्तावाचा मसुदा सुसंगत असल्याबाबत आणि प्रसिध्दीसाठी आवश्यक अशा संक्षिप्त स्वरुपात व विहित केलेल्या पध्दतीनुसार असल्याबाबत समाधान झाल्यानंतर प्राधिकरण जलसंपदा विभागास तसे निर्देश देईल.

६.५ प्राधिकरण जलसंपदा विभागास, त्यांच्या अधिपत्याखालील जिल्हयातील सर्व पाटबंधारे मंडळास व तालुका मुख्यालयी असलेल्या उपविभागात अथवा जेथे उपविभाग नसेल तेथे तालुक्याच्या पंचायत समिती कार्यालयात, प्रशुल्क प्रस्तावाच्या प्रती उपलब्ध करण्यास, जलसंपदा विभागाच्या संकेतस्थळावर सुध्दा (वेबसाईवर)

प्रसिध्दी देण्यास आणि अभिप्राय / सूचना ३० दिवसांच्या कालावधीत मागविण्याचे, निर्देश देईल.

६.६ जलसंपदा विभाग लाभार्थी / हितसंबंधींकडून प्राप्त झालेल्या सर्व सूचना / अभिप्राय संकलीत करील व विभागाच्या अभिप्रायांसह प्राधिकरणास पाठवेल.

६.७ प्राधिकरण, वृत्तपत्रात सूचना प्रसिध्दीस दिलेल्या दिनांकापासून ६० (साठ) दिवसांच्या आत, प्राप्त झालेल्या सूचना व अभिप्राय विचारात घेऊन १ जुलै २०१३ पासून अथवा प्राधिकरणाने निश्चित केलेल्या अशा दिनांकापासून कृषी, घरगुती आणि औद्योगिक वापराकरिता ठोक पाणी प्रशुल्क आदेश निर्गमित करेल. कृषीसिंचन वापराकरिता प्रत्येक पीकासाठीच्या क्षेत्राधारित दराबाबतचे जलसंपदा विभागाने निर्गमित करावयाचे आदेश प्राधिकरण मंजूर करील.

६.८ प्रशुल्क आदेशाचे पुनर्विलोकन करण्याबाबतच्या अर्जांसाठी लाभार्थी/हितसंबंधीकडून प्राधिकरणाच्या संबंधित विनियमात निर्देशिलेल्या कार्यपध्दतीचे पालन केले जाईल.

## ७.० देखभाल व दुरुस्तीची मानके:

कालवे प्रणाली, शीर्षकामे व अनुषंगिक कामे याकरिता पुरेशा अशा नियमित देखभालीसाठी देखभाल व दुरुस्तीची मानके राज्य शासन विहित करील. ***शासनाने क्र. संकीर्ण-२००७/(१३/०७)/सिंव्य(कामे) दि.२७ ऑगस्ट २०१३ नुसार सुधारित मानके विहित केली आहे. देखभाल व दुरुस्तीसाठी लागणाऱ्या निधीचे अंदाज या विहित मानकांनुसार परिगणित करणे आवश्यक असेल.***

## ८.० प्रचालन व परिरक्षण खर्चाचे विचारात घ्यावयाचे घटक:

८.१ वार्षिक प्रचालन व परिरक्षण खर्चाच्या अंदाजामध्ये विचारात घ्यावयाच्या घटकांमध्ये पुढील बाबी अंतर्भूत असतील -

(क) जलसंपदा विभागाच्या/पाटबंधारे विकास महामंडळाच्या प्रकल्पांतर्गत पाणी पुरवठयाशी संबंधित कालवे प्रणालीतील व (धरणाच्या) शीर्ष कामासंबंधित तसेच पाणी पुरवठयासाठी अनुषंगिक असलेल्या पायाभूत सुविधांसाठी आवश्यक असणारी परिरक्षण व दुरुस्तीची कामे.

(ख) राज्य शासनाने विहित केलेल्या मानकानुसार सिंचन प्रकल्पांच्या देखभालीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या जलसंपदा विभागाच्या /पाटबंधारे विकास महामंडळाच्या कर्मचाऱ्यांचा आस्थापना खर्च-ज्यात मूळ वेतन, महागाई भत्ता, बोनस, इतर भत्ते इत्यादी यांचा-राज्य शासनाने मंजूर केल्याप्रमाणे समावेश असेल त्याचप्रमाणे त्यात प्रवास व भत्ते, वकीलाची फी, लेखा तपासणी फी, इ. जलव्यवस्थापनाशी संबंधीत खर्च असतील. आस्थापना खर्चामध्ये न्यायालयीन खर्च, लेखापरीक्षण फी अशा जल व्यवस्थापनाशी संबंधित खर्चाचाही समावेश असेल.

८.२ प्रचालन व परिरक्षण खर्च यात पुढील गोष्टी अंतर्भूत नसतील -

(क) घसारा, कर्जावरील व्याज, विशेष दुरुस्त्या, धरण व सिंचन प्रणाली यांचा पुनर्स्थापना खर्च यासह पाटबंधारे प्रकल्पावरील सर्व भांडवली खर्च.

(ख) जलविद्युत घटकांचा प्रचालन व परिरक्षण खर्च

(ग) शासनाच्या निर्धारित मानकापेक्षा अतिरिक्त असलेल्या सेवकवृंदाप्रीत्यर्थचा आस्थापना खर्च.

(घ) शासकीय उपसा सिंचन योजनांचा उर्जा खर्च ***यापूर्वीच्या (२०१०-१३) निकषात दिल्यानुसार प्रकल्पनिहाय प्रत्येक उपसासिंचन योजने करिता आवर्तननिहाय दर निर्धारणामध्ये राज्यशासनाने स्वतंत्ररित्या निर्धारित केलेल्या ऊर्जा दरानुसार येणारा वार्षिक ऊर्जा खर्च असेल.***

८.३ ***नियंत्रण कालावधी सन २०१३-१६ करिता प्रचालन व परिरक्षण यांचा खर्च २०१३-१४ च्या अंदाजित खर्चावर आधारित असेल. पुढील वर्षांसाठी प्रतिवर्ष १० टक्के वाढ करुन दर आकारण्यात येतील.***

**९.० प्रशुल्केतर आणि इतर उत्पन्न :**

प्रशुल्क वसुलीद्वारे प्राप्त होणाऱ्या महसुलाचा अंदाज बांधताना, प्रशुल्केतर उत्पन्नाचा (म्हणजे निविदा, भंगार यांची विक्री, जलविद्युत निर्मिती, मत्स्यसंवर्धन यापासून मिळणारे स्वामित्व शुल्क, मनोरंजन, जलाशयाभोवतीचा पर्यटन विकास यांद्वारे मिळणारे उत्पन्न) सध्या विचार केला जाणार नाही.

**१०.० शासकीय अर्थसहाय्य (Subsidy):**

अंदाजित प्रचालन व परिरक्षण खर्च भागविण्याकरिता जलसंपदा विभाग क्षेत्रीय यंत्रणेस आवश्यक निधी उपलब्ध करील. प्रशुल्क आदेशानुसार अंदाजित प्रशुल्क वसुली आणि अंदाजित प्रचालन व परिरक्षण खर्च यातील महसुली तूट शासनाकडून अर्थसहाय्य (Subsidy) समजण्यात येईल.

**११.० महसूली तूट / आधिक्य :**

नियंत्रित कालावधीतील प्रत्येक वर्षाच्या अखेरीस, प्रवर्गनिहाय व स्त्रोतनिहाय वापरलेले पाणी, आकारलेले प्रशुल्क, वसूल झालेला महसूल, विहित मानकानुसार सिंचन क्षमतेपैकी सिंचित क्षेत्र व सिंचन न झालेले क्षेत्र यासाठी आवश्यक देखभाल व दुरुस्ती खर्च, प्रत्यक्ष देखभाल व दुरुस्ती खर्च, आस्थापना खर्च व (असल्यास) पुरविलेला निधी याची माहिती जलसंपदा विभाग, प्राधिकरणाला पुरवील. आधीच्या वर्षातील प्रशुल्काची थकबाकी (आकारणी व वसुली) ही महसूली तूट/आधिक्य

निर्धारित करताना विचारात घेतली जाणार नाही. शास्ती / दंड यामुळे मिळणारा महसूल आणि प्रोत्साहने / सवलती यामुळे होणारी महसूलातील तूट स्वतंत्रपणे दाखविण्यात येईल.

**१२.० प्रचालन आणि परिरक्षण खर्चाची विभागणी :**

१२.१ या निकषाच्या परि.७.१ (क) आणि (ख) मध्ये विहित केल्यानुसार एकूण प्रचालन आणि परिरक्षण खर्चाची विभागणी ही (अ) परवडण्याची क्षमता (ब) सुलभ उपलब्धता (क) ***समयोचितता*** आणि ***(ड) पाण्याच्या गुणवत्तेवरील परिणाम*** या ***चार*** मुलभूत घटकांवर आधारित कृषि, घरगुती आणि उद्योग या वापरकर्त्यांच्या प्रवर्गामध्ये करण्यात येईल. ही विभागणी खालील परि. १२.२ ते १२.५ मध्ये दिल्यानुसार तीन टप्प्यात करण्यात येईल.

१२.२ प्रथम ***चार*** घटकांपैकी प्रत्येकास भारांकन (भारित टक्केवारी) नेमून देण्यात येईल जे सर्व वापरकर्त्यांसाठी सामायिक असेल. भारांकन टक्केवारी पुढीलप्रमाणे असेल.

| घटक | भारांकन (भारित टक्केवारी) |
|---|---|
| ***परवडण्याची क्षमता*** | ***६० टक्के*** |
| ***सुलभ उपलब्धता*** | ***१० टक्के*** |
| ***समयोचितता*** | ***१० टक्के*** |
| ***पाण्याच्या गुणवत्तेवरील परिणाम*** | ***२० टक्के*** |

१२.३ परवडणे, सुलभ उपलब्धता, समयोचितता ***आणि पाण्याच्या गुणवत्तेवरील परिणाम*** या निकषांआधारे पाणीवापराच्या प्रत्येक प्रवर्गास लागू होऊ शकणारी आस्थापना व दुरुस्ती खर्चाची विभागणी प्रत्येक घटकास शंभर रुपये धरल्यास ती खालीलप्रमाणे असेल :

| घटक | कृषी | घरगुती | उद्योग | एकूण |
|---|---|---|---|---|
| *परवडण्याची क्षमता* | *१५* | *१५* | *७०* | *१००* |
| *सुलभ उपलब्धता* | *७५* | *१५* | *१०* | *१००* |
| *समयोचितता* | *२०* | *३०* | *५०* | *१००* |
| *पाण्याच्या गुणवत्तेवरील परिणाम* | *१३* | *५४* | *३३* | *१००* |

१२.४ घटकांची भारांकन टक्केवारी (निकष परि.१२.२) वरील विभागणीस लागू केल्यानंतर होणारी प्रचालन व परिरक्षण खर्चाच्या विभागणीची टक्केवारी खालील प्रमाणे येईलः

| घटक | कृषि | घरगुती | उद्योग |
|---|---|---|---|
| *परवडण्याची क्षमता* | *१५ X ०.६ = ९* | *१५ X ०.६ = ९* | *७० X ०.६ = ४२* |
| *सुलभ उपलब्धता* | *७५ X ०.१ = ७.५* | *१५ X ०.१ = १.५* | *१० X ०.१ = १* |
| *समयोचितता* | *२० X ०.१ = २* | *३० X ०.१ = ३* | *५० X ०.१ = ५* |
| *पाण्याच्या गुणवत्तेवरील परिणाम* | *१३ X ०.२ = २.६* | *५४ X ०.२ =१०.८* | *३३ X ०.२ =६.६* |
| एकूण | *२१.१* | *२४.३* | *५४.६* |
| समजा | *२१* | *२४* | *५५* |

१२.५ कृषी सिंचन वापराकरीता आलेल्या ***२१ टक्के*** विभागणीपैकी कालव्यातील पाझरामुळे होणा-या भूजल पुनर्भरणापोटी आकारावयाची विहिरीवरील पाणीपट्टी माफ करण्याच्या राज्य शासनाच्या धोरणात्मक निर्णयामुळे ५ टक्के शासनाचे अनुदान राहील. त्यामुळे कृषी सिंचनाचा प्रत्यक्ष वाटा ***१६ टक्के*** असेल.

१२.६ नियंत्रण कालावधी ***सन २०१३-१६ करिता प्रचालन व परिरक्षण यांचा खर्च २०१३-१४ च्या अंदाजित खर्चावर आधारित असेल. पुढील वर्षासाठी प्रतिवर्ष १० टक्के वाढ करुन दर आकारण्यात येतील.*** परिरक्षण व प्रचालन खर्चाची तीनही प्रवर्गांकरिता या नुसार केलेली विभागणी मूळ दर निश्चित करताना वापरली जाईल. सवलती / दंड यामुळे होणारी महसूलातील तूट / आधिक्य मूळ दर निश्चित करताना धरली जाणार नाही. तथापि ती निकषाच्या परिच्छेद ११ मध्ये दिल्यानुसार स्वतंत्रपणे विचारात घेतली जाईल.

## १३.० प्रशुल्क निर्धारणामध्ये अनुसरावयाची तत्वे/प्रोत्साहने/सूट/दंड/तरतुदी

### १३.१ कृषी

१३.१.१ तत्वे

(एक) क्षेत्राधारित दरामध्ये प्रत्येक पिकाचे मूळ दर रबी हंगामाकरिता निश्चित केले जातील. क्षेत्राधारित मूळ दर निश्चित करताना नगदी पिके वगळून इतर पिकांसाठी ढोबळ उत्पादन मूल्याच्या ३ ते ५ टक्के आणि नगदी पिकांच्या (उदा. ऊस, केळी, फळबागा इ.) बाबतीत ढोबळ उत्पादन मूल्याच्या ८ ते १० टक्के यापेक्षा अधिक प्रशुल्क असणार नाही यांची सुनिश्चिती करण्यात यावी., तसेच फळबागांकरिता क्षेत्राधारित मूळ दर हा पाणी वापराच्या दृष्टीने ऊस व केळी करिता असलेल्या मूळ दराच्या ७५ टक्के पेक्षा अधिक असणार नाही. १३.१.२ (iv) मधील तरतूद फळबागांकरिता देखील लागू राहील.

(दोन) खरीप/उन्हाळी हंगामात पिकांची नावे रबी वर्गवारीप्रमाणे (उदा. भाजीपाला) असतील. खरीप पिकांसाठी मूळ दराच्या ५० टक्के दर आकारण्यात येईल आणि उन्हाळी पिकांसाठी मूळ दराच्या ***१५०*** % दर आकारण्यात येईल. तथापि खरीप/उन्हाळी हंगामातील अन्य पिकांसाठी निकषाचा परिच्छेद १३.१.१ (एक) लागू होईल. तथापि ५० % आणि ***१५०*** % चा मापदंड दुहंगामी आणि बारमाही पिकांचे खरीप व उन्हाळी हंगामातील दर निश्चित करताना वापरण्यात येईल.

(तीन) विविध पिकांचे ढोबळ मूल्य ठरविताना पिकांच्या सिंचित उत्पादनाबरोबर शासनामार्फत निश्चित केलेले किमान आधारभूत मूल्य (MSP) विचारात घेतले जाईल. सन २०१३-१६ करिता दर ठरविताना या दोन घटकांची आकडेवारी मार्च २०१२ मध्ये प्राधिकरणाने तयार केलेल्या आणि लाभार्थीकडून अभिप्राय / सूचना देण्यासाठी प्रसृत केलेल्या सन २०१३-१६ साठी ठोक पाणी प्रशुल्क निर्धारणाच्या निकषांच्या दृष्टीनिबंधामध्ये यापूर्वीच

दिलेली आहे. प्राप्त होणाऱ्या सूचनांवर आधारित या माहितीमध्ये प्राधिकरण आवश्यक ते बदल करु शकते.

(चार) क्षेत्राधारित प्रशुल्क निर्धारणासाठी पिकांच्या गटांची संख्या कमी करण्याच्या दृष्टीने पिकांची विभागणी खालील प्रमाणे खरीप, रबी, दुहंगामी, उन्हाळी आणि बारमाही या पाच प्रमुख गटात करण्यात येईल, म्हणजेच -

| **खरीप** | **रबी** | **उन्हाळी** |
|---|---|---|
| १) अन्नधान्य, व इतर पिके | ५) भाजीपाला | ८) भाजीपाला |
| २) भुईमूग | ६) गहू | ९) भुईमूग |
| ३) भाजीपाला | ७) ज्वारी, कांदा, इतर रबी | १०) भात, ***इतर उन्हाळी*** |
| ४) भात, ***इतर खरीप*** | | |

| **दुहंगामी** | **बारमाही** |
|---|---|
| ११) मिरची, आले, तूर इत्यादी | १३) ऊस, केळी |
| १२) कापूस ***व इतर दुहंगामी*** | १४) फळबागा ***व इतर बारमाही*** |

(पाच) कृषी वापराकरिता ठोक पाणी प्रशुल्काचे घनमापन दर **परिशिष्ट १** मध्ये दिलेल्या पध्दतीनुसार निश्चित करण्यात येतील.

(सहा) खाजगी उपसा सिंचन योजनांसाठी क्षेत्राधारित व ठोक पाणी प्रशुल्क **परिशिष्ट ३** मध्ये दिल्यानुसार परिगणित करण्यात येतील.

(सात) शासकीय उपसा सिंचन योजनांसाठी क्षेत्राधारित व ठोक पाणी प्रशुल्क **परिशिष्ट ४** मध्ये दिल्यानुसार परिगणित करण्यात येतील.

(आठ) पाण्याचे दर सामान्य परिस्थिती तसेच टंचाई / आपत्ती / अवर्षण या कालावधीत सारखेच राहतील. तथापि, राज्य शासन टंचाई / आपत्ती / अवर्षण या कालावधीत पाणीपट्टीत सूट / सवलत देण्याचा विचार करेल व तेवढयाच रकमेचे अर्थसहाय्य

देईल ज्यायोगे प्रचालन व परिरक्षणासाठी लागणाऱ्या निधीचा तुटवडा भासणार नाही.

### १३.१.२ पिकांचे क्षेत्राधारित दर

#### १३.१.२.१ सूट / सवलती

(एक) दोन हेक्टर पेक्षा कमी क्षेत्रधारक शेतकऱ्यांसाठी मूळ दराच्या ७५ टक्के सवलतीचा दर म्हणून आकारण्यात येईल.

(दोन) विदर्भातील पंतप्रधान कार्यक्रमा अंतर्गत असलेल्या तसेच महाराष्ट्र शासनाने नक्षलग्रस्त घोषित केलेल्या क्षेत्रातील ४ हेक्टर पेक्षा कमी क्षेत्र धारक शेतकऱ्यांना मूळ दराच्या ५० टक्के प्रमाणे आकारणी करण्यात येईल.

**टीप** : वरील (एक) आणि (दोन) या दोन्ही प्रकारची सूट ही ऊस, केळी व फळबागांसारख्या नगदी पिकांना लागू असणार नाही.

(तीन) आदिवासी विकास उपयोजने अंतर्गत राबविलेल्या प्रकल्पांतर्गत आदिवासी शेतकऱ्यांना कोणतेही प्रशुल्क आकारण्यात येणार नाही.

(चार) प्रकल्पग्रस्त लोकांना सर्व पिकांसाठी मूळ दराच्या ७५ टक्के प्रमाणे प्रशुल्क आकारणी करण्यात येईल.

(पाच) आंबा, संत्री, द्राक्षे, चिकू, हळद, चिंच, आवळा, नारळ यासारख्या फळबागा पिकांना उत्पादनक्षम होण्यासाठी अवधी लागत असल्यामुळे खालील नमूद सुरवातीच्या कालावधीसाठी कोणतेही क्षेत्राधारित दर आकारले जाणार नाहीत -

| | | | |
|---|---|---|---|
| अ) | द्राक्षे | - | सुरवातीची २/३ वर्षे |
| ब ) | संत्री/मोसंबी | - | सुरवातीची ४ वर्षे |
| क) | आंबा/चिकू/हळद/आवळा/चिंच/नारळ | - | सुरवातीची ५/७ वर्षे |

टीप :- निर्देशित सुरवातीचा कालावधी जिल्हा कृषी अधिकारी यांचेकडून प्रमाणित करुन घ्यावा.

तथापि सदर कालावधीत आंतरपिक घेतल्यास संबंधित आंतरपिकांच्या अनुषंगाने योग्य त्या दराने आकारणी करण्यात येईल. या खेरीज आंतर पीक घेतले असो वा नसो वर नमूद केलेला सुरवातीचा कालावधी संपल्यावर फळबागांचा पूर्ण दर आकारला जाईल.

(सहा) जर खरीप पीकासाठी पाण्याचे लांबलेले आवर्तन रबी मध्ये घेतले अथवा रबी पिकाचे उन्हाळी मध्ये घेतले तर संबंधित खरीप / रबी दर लांबलेल्या आवर्तनास आकारण्यात येतील.

(सात) जुन्या माल गुजारी तलावाखालील क्षेत्रासाठी ***सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार परंपरागत हक्कानुसार पाणी वापरासाठी कोणताही आकार न करण्याची*** रुढ पध्दत चालू राहील.

(आठ) विदर्भातील करारा खाली लागवड होणा-या दोन्ही हंगामातील धान क्षेत्रातील भातपीकासाठी ***आणि कोकण प्रदेशातील भातपीकासाठी*** ५० टक्के अनुज्ञेय दर लागू राहील.

**१३.१.२.२ प्रोत्साहने:**

(एक) क्षेत्राधारीत पुरवठ्यामध्ये आधुनिक सिंचन ***(ठिबक व तुषार)*** पध्दतीचा अवलंब केल्यास अनुज्ञेय दराच्या ***७५*** % दर आकारण्यात येईल. परंतु फळबागांसाठी ही सवलत फळबागांचा पूर्ण वाढीचा नमूद केलेला कालावधी संपल्यानंतर जेव्हा पूर्ण दर अनुज्ञेय होईल तेव्हाच ती दिली जाईल.

(दोन) क्षेत्राधारीत पुरवठ्यामध्ये ***ऊस व केळी या नगदी बारमाही पिकासाठी*** आधुनिक सिंचन पध्दतीचा ***(ठिबक व तुषार)*** अवलंब केल्यास ***त्यासाठी*** अनुज्ञेय दराच्या ***७५*** % दर आकारण्यात येईल. ***अन्यथा जे आधुनिक सिंचन पध्दतीचा अवलंब करणार नाहीत त्यांना अनुज्ञेय दराच्या १५० टक्के दराने आकारणी करण्यात येईल.***

(तीन) हंगामापूर्वी आगाऊ पाणीपट्टी भरल्यास दरामध्ये ५ % सूट देण्यात येईल.

**१३.१.३ दंड/शास्ती -**

(एक) **कुटंबाचा आकार** - कायदा अधिनियमित होण्याच्या एक वर्षानंतर, (म्हणजेच ८/६/२००५ पासून एक वर्षानंतर अथवा ८/६/२००६ नंतर) दोनपेक्षा अधिक अपत्ये असलेल्या शेतकऱ्यांना लागू असलेल्या दराच्या १.५ पटीने जलदर आकारण्यात येईल. तसेच अधिनियमाच्या कलम १२(११) (क) व (ख) च्या तरतुदी लागू होतील.

(दोन) विहीत कालावधीनंतर विलंबाने देयक भरल्यास दरमहा १ टक्के अथवा १२ टक्के प्रतिवर्षी प्रमाणे दंड आकारण्यात येईल.

**१३.१.४ पाणी वापर संस्थांसाठी घनमापन शुल्क -**

**१३.१.४.१ सवलती**

(एक) पाणी वापर संस्था स्थापन होण्यास आणि क्षेत्राधारित पुरवठयाऐवजी घनमापन पुरवठयाचा अवलंब करण्यास प्रोत्साहन देण्याकरिता या निकषाच्या परिशिष्ट १ मध्ये दिलेल्या पध्दतीनुसार येणाऱ्या दराच्या २५ टक्के सवलत दिली जाईल.

(दोन) ज्या पाणी वापर संस्था त्यांच्या सभासदांना क्षेत्रधारणावर आधारित सवलती (निकष १३.१.२.१ (एक आणि दोन नुसार) तसेच कुंटुब आकारावर आधारित दंड (निकष १३.१.२.३ (एक) नुसार) आकारत असतील त्यांना घनमापन दरात आणखी ***१५ टक्के*** सवलत देण्यात येईल.

(तीन) भातक्षेत्रात तयार झालेल्या पाणी वापर संस्थांसाठी खरीपातील घनमापन दर, खरीप क्षेत्राधारित दर आणि २५०० घनमीटर / हेक्टर प्रमाणे पाण्याची आवश्यकता विचारात घेवून परिगणित करण्यात येतील. ***भातपीक घेणा-या कोकण व विदर्भ इ. भागात पाणी वापर संस्था स्थापन करण्यास उद्युक्त करण्यासाठी*** आलेल्या दराच्या ५० टक्के दर प्रत्यक्ष आकारला जाईल. रबी मध्ये खरीपाच्या २ पट दर आणि उन्हाळी हंगामामध्ये ***खरीपाच्या ३*** पट दर आकारण्यात येईल.

***वरील १३.१.२.१(आठ) मधील सवलत अशा प्रकारे आलेल्या दरावर आकारली जाईल.***

**१३.१.५ कृषिक्षेत्रातील ठोक पाणी वापराच्या जलदराची परिगणना करण्याची पध्दत**

(एक) निकषाच्या १२.५ नुसार प्रचालन व परिरक्षण खर्चाच्या ***१६ टक्के*** भाग कृषि क्षेत्रास वाटयाला येतो आणि या प्रमाणे तो शुल्क वसुल करण्यायोग्य ठरतो.

(दोन) निकषाच्या परिच्छेद १३.१.१. (एक) नुसार पिकवार क्षेत्राधारित दर ठरविले जातील.

(तीन) लघुवितरिका स्तरावरील पाणी वापर संस्थांकरिता घनमापन दर (भातक्षेत्रा व्यतिरिक्त क्षेत्रासाठी) परिशिष्ट १ मध्ये दिल्यानुसार परिगणित करण्यात येतील.

(चार) भात क्षेत्रातील पाणी वापर संस्थांकरिता घनमापन दर निकषाच्या परिच्छेद १३.१.४.१ (तीन) नुसार परिगणित करण्यात येतील.

(पाच) खाजगी व शासकीय उपसा सिंचन योजनांचे दर अनुक्रमे परिशिष्ट ३ आणि ४ नुसार परिगणित करण्यात येतील.

(सहा) क्षेत्राधारित सिंचन, घनमापन पध्दतीने पाणी दिले जाणाऱ्या सिंचन आणि उपसा सिंचन योजना या पासून मिळणारा एकूण महसूल काढण्यात येईल आणि जर तो प्रचालन व परिरक्षण खर्चाच्या कृषिसिंचनासाठी केलेल्या विभागणीपेक्षा अधिक असेल तर दर कमी करण्यात येतील आणि कमी असल्यास दर वाढवून खर्च व महसूलाची आकडेवारी जुळे पर्यंत वरील पध्दतीने आकडेमोड करुन दर निश्चित केले जातील. उत्पादनाच्या एकूण किंमतीशी निगडीत असलेल्या पिकाच्या दरांच्या मर्यादा विचारात घेतल्या जातील (निकष १३.१.१ (एक)). केवळ त्याच सवलती ज्या क्षेत्रधारणाशी निगडीत असतील ***व*** अंदाजक्षम व लक्षणीय महसूलार्जनक्षम ***असतील अशा*** दर ठरविताना विचारात घेतल्या जातील. सिंचनाच्या आधुनिक पध्दती अवलंबिल्यामुळे द्याव्या लागणाऱ्या अन्य सवलती आणि इतर सवलतीमुळे होणारी महसूलातील तूट दर ठरविण्याच्या आकडेमोडीत विचारात घेतली जाणार नाही

कारण कोणत्याही परिस्थितीत त्यायोगे वाचलेल्या पाण्यापासून राज्यास अतिरिक्त महसूल मिळणार आहे.

## १३.२ घरगुती वापर

### १३.२.१ ***दरनिर्धारणाची कार्यपध्दती :-***

(एक) मूळ दरांची सांगड पुरवठा स्त्रोताशी खाली दिलेल्या वर्गवारीनुसार घालण्यात येईल –

| अ.क्र. | वर्गवारी | पुरवठ्याचा स्त्रोत | ***अनुज्ञेय*** जलदर |
|---|---|---|---|
| अ | आश्वासित पाणी पुरवठा | मोठे / मध्यम जलाशय /मोठया व मध्यम प्रकल्पावरील कालवा उपसा / कालवा नसलेले साठवण तलाव | मूळ दर |
| ब | वहन व्ययासह नियंत्रित पाणी पुरवठा | धरणाच्या खालच्या बाजूचा नदीचा नियंत्रित भाग / जलाशयाचा आधार असलेला कोल्हापूर पध्दतीचा बंधारा/ जलविद्युत् केंद्रातील अवजल | प्रत्यक्ष उचललेल्या पाण्यास मूळ दराच्या दोन पट |
| क | अंशतः आश्वासित पाणी पुरवठा | कालवा असलेला लहान जलाशय / जलाशयाचा आधार नसलेला कोल्हापूर पध्दतीचा बंधारा / को.प. बंधारा वा बंधारा नसलेली अनियंत्रित नदी | मूळ दराच्या ५० % |
| ड | पाणी वापरकर्त्या ***संस्थेने / गटाने*** पायाभूत सुविधा निर्मितीतील (जलाशय इ.) प्रमाणशीर खर्चाचा वाटा उचलला असेल | पाणी वापरकर्त्या गटाने (ग्रामपंचायत, नगरपालिका, महानगरपालिका व तत्सम संस्था) धरण/बंधारा/ कोल्हापूर पध्दतीचा बंधारा यांचा प्रमाणशीर खर्चाचा वाटा उचलला असेल | खालील टीप पहावी |
| इ | पाणी वापरकर्त्या गटाने पायाभूत सुविधा (जलाशय इ.) निर्माण केली असेल ***व देखभाल दुरुस्ती करत असेल तर*** | पाणी वापरकर्त्या गटाने (ग्रामपंचायत, नगरपालिका, महानगरपालिका व तत्सम संस्था) धरण/बंधारा/ कोल्हापूर पध्दतीचा बंधारा स्वखर्चाने बांधला असेल | मूळ दराच्या ३३ % |

**टीप** :- १) वहनव्यय वापरकर्त्यांनी सोसावयाचा आहे. बाष्पीभवनव्यय जलसंपदा विभागाने सोसावयाचा आहे.

२) पायाभूत सुविधांचा पूण खर्च / ***प्रमाणशीर खर्च*** उचलण्याबाबत जुन्या कराराने बध्द असल्यास अथवा नवीन प्रकल्पांच्या नियोजनाच्या टप्प्यात सहमती झाल्यानुसार पायाभूत सुविधांचा प्रमाणशीर खर्चाचा वाटा उचलावयाचा असल्यास अथवा एखाद्या पाणी वापरकर्त्या गटाने धरणाच्या खालील बाजूस पाणी उचलण्यासाठी बंधारा / बांध बांधला असेल तर अनुज्ञेय दराच्या ३३ टक्के दर आकारले जातील. परंतु ***नवीन करारांकरीता*** पूर्ण झालेल्या धरणातून मंजूर केलेल्या पाणी कोटयाचेबाबत प्रमाणशीर खर्चापैकी दिलेली कोणतीही रक्कम ही आगाऊ पाणीपट्टी समजण्यात येईल आणि मूळ दराच्या ३३ टक्के सवलतीच्या दरानुसार व १० टक्के व्याज दरानुसार धरणाची / बंधाऱ्याची निव्वळ सांप्रत किंमत वळती होईपर्यंत येणाऱ्या कालावधीकरिता पाणीपट्टी आगाऊ भरल्याचे समजण्यात येईल. आगाऊ पाणीपट्टीची पूर्ण रक्कम वळती झाल्यानंतर योग्य तो मूळ दर अनुज्ञेय होईल.

(दोन) खरीप, रबी आणि उन्हाळी हंगामाकरिता मूळ दर कायम राहील.

(तीन) महापालिका / नगरपालिका समवेत ठोक पाणी पुरवठा करार करताना औद्योगिक तसेच व्यापारी तत्वावरील वापराचे प्रमाण स्वतंत्रपणे निश्चित केले जाईल आणि त्यासाठी उचित औद्योगिक दर आकारण्यात येईल.

(***चार***) ग्रामीण व शहरी भागातील वापरकर्त्यांसाठी खालीलप्रमाणे वेगवेगळे दर राहतील

| | | |
|---|---|---|
| क) | ग्रामपंचायती | - पायाभूत दराच्या ७५ टक्के |
| ख) | नगरपालिका | - पायाभूत दराच्या ९० टक्के |
| ग ) | महानगरपालिका<br>(अ, ब, क आणि ड वर्ग) | - पायाभूत दराच्या १२५ टक्के. |

**१३.२.२ प्रोत्साहनेः**

(एक) ***जेव्हा हे निकष लागू असतील तेव्हा नगरपालिका / महानगरपालिका समवेत घेणाऱ्या सर्व नवीन कराराराम्यांमध्ये महापालिका / नगरपालिकेच्या उत्सर्जित जल प्रक्रिया केंद्राचा (STP) त्यांना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या प्रमाणकानुसार प्रक्रिया केलेले सांडपाणी २०***

***टक्के अथवा त्याहून अधिक प्रमाणात प्रक्रिया करुन व करारातील पूर्वअट / तरतूदींच्या आधीन राहून विशिष्ट प्रमाणात कृषि, औद्योगिक अथवा व्यापारी वापरास्तव पुनर्वापर करण्याची मुभा देण्यात येईल. परंतू, नगरपालिका / महानगरपालिका अन्य कोणत्याही संस्थेस प्रक्रियायुक्त सांडपाणी विकण्यासाठीचे योग्य ते ठोक जलदर प्रकरणनिहाय अभ्यास करुन प्राधिकरण निश्चित करेल.***

**१३.२.३ दंड/शास्ती :**

(एक) महापालिका / नगरपालिकांची अतिरिक्त मागणी जेथे शक्य असेल तेथे पुनर्प्रक्रिया व पुनर्वापराने भागविली जाईल. तथापि याचा विचार पाणीपुरवठ्याचे मापदंड व जललेखे यांच्या पुनर्विलोकनानंतर व सांडपाणी प्रक्रिया केंद्रे (STP) उभारण्याच्या प्रगतीच्या आढाव्यानंतर केला जाईल.

(दोन) पाणी टंचाई / आपत्ती कालावधीमध्ये जलाशयामधील पिण्याच्या पाण्याच्या वापराकरिता प्रत्यक्ष पाणी वापर कसाही असला तरी पाणी वापरकर्त्या गटाने केलेल्या पूर्ण आरक्षणासाठी दर आकारण्यात येईल आणि त्यात बाष्पीभवन व वहन व्ययाचा समावेश असेल.

(तीन) जून २०१३ पासून खाली दिलेल्या अ, ब, क आणि ड वर्गातील २३ महानगरपालिकांना त्यांनी सन २०१०-१३ च्या निकषातील परिच्छेद १३.२.४ (तीन) नुसार दि. ३०/५/२०११ च्या ठोक जलदर आदेशापासून २ वर्षाच्या आत, आवश्यक त्या मानकानुसार सांडपाणी शुध्द करण्यासाठी नवीन अथवा अतिरिक्त सांडपाणी प्रक्रिया केंद्रे (STP) उभारण्याचा कृती आराखडा देण्याबाबतच्या तरतुदीचे अनुपालन केले नसल्यामुळे ठोक पाणी वापराच्या प्रशुल्काच्या दीड पट दर आकारण्यात येईल.

| अ | ब | क | ड | |
|---|---|---|---|---|
| बृहन्मुंबई<br>नवी मुंबई | पुणे<br>नागपूर | ठाणे<br>नाशिक<br>पिंपरी-चिंचवड | (१) कल्याण-डोंबिवली<br>(२) उल्हासनगर<br>(३) भिवंडी-निजामपूर<br>(४) मीरा-भाईंदर<br>(५) मालेगाव<br>(६) अहमदनगर<br>(७) धुळे<br>(८) वसई-विरार<br>(९) अकोला | (१०) सांगली-मिरज-कुपवाड<br>(११) सोलापूर<br>(१२) कोल्हापूर<br>(१३) औरंगाबाद<br>(१४) नांदेड-वाघाळा<br>(१५) अमरावती<br>(१६) जळगाव |

टीप :- ड वर्गातील लातूर, परभणी आणि चंद्रपूर सारख्या नवीन महानगरपालिकांनी २०१३-१६ च्या ठोक जलदर आदेशापासून २ वर्षाच्या आत, आवश्यक त्या मानकानुसार सांडपाणी शुध्द करण्यासाठी नवीन अथवा अतिरिक्त सांडपाणी प्रक्रिया केंद्रे (STP) उभारण्याचा कृती आराखडा सादर करणे आवश्यक राहील.

**१३.२.४ घरगुती दराची परिगणना करण्याची पध्दत**

(एक) निकषाच्या परिच्छेद १२.४ नुसार सन २०१४-१५ च्या प्रचालन व परिरक्षण खर्चाच्या ***२४ टक्के*** वाटा घरगुती वापरासाठी अनुज्ञेय ठरतो.

(दोन) या खर्चानुसार प्रथम सन ***२०१३-१४ च्या अंदाजित खर्चावर मूळ दर आधारित असेल. पुढील वर्षासाठी प्रतिवर्ष १० टक्के वाढ करुन दर आकारण्यात येतील.***

(तीन) एकूण अंदाजित पाणी वापर घरगुती वापरकर्त्यांच्या उपप्रवर्गामध्ये म्हणजेच ग्रामयपंचायत, नगरपालिका आणि महानगरपालिका यामध्ये आणि प्रत्येक उपप्रवर्गाची पुन्हा पुरवठयांच्या विविध स्त्रोतांमध्ये निकष १३.२.१ (एक) नुसार उपविभागणी करण्यात येईल. या विभागणीसाठी वापरण्यात आलेली टक्केवारी ही पूर्वीच्या माहितीनुसारच्या सरासरीवर आधारित असेल.

(चार) प्रारंभी विविध प्रवर्गांसाठी वरील प्रमाणे आलेले सरासरी घनमापन दर वापरुन मिळू शकणारा एकूण महसूल काढण्यात येईल आणि जर तो प्रचालन व परिरक्षण

खर्चाच्या घरगुती वापरासाठी केलेल्या विभागणीपेक्षा कमी-अधिक असेल तर दर अधिक-कमी करण्यात येतील आणि खर्च व महसुलाची आकडेवारी जुळे पर्यंत वरील पध्दतीने आकडेमोड करुन मूळ दर निश्चित केले जातील.

(पाच) सवलतीमुळे महसूलात येणारी तूट आणि दंडामुळे होणारी वाढ दर ठरविण्याच्या प्रक्रियेमध्ये विचारात घेतली जाणार नाही.

## १३.३ औद्योगिक वापर

### १३.३.१ *दरनिर्धारणाची कार्यपध्दती :-*

(एक) खाली दर्शविलेल्या वर्गवारीनुसार आणि नैसर्गिक जलप्रवाह अथवा सिंचन प्रणालींमध्ये सांडपाणी सोडण्यापूर्वी आवश्यक त्या मानकानुसार शुध्द करण्याच्या अटीवर, पाणी पुरवठयाच्या स्त्रोताशी मूळ दराची सांगड घालण्यात येईल –

| अ. क्र. | वर्गवारी | पुरवठ्याचा स्त्रोत | ***अनुज्ञेय*** जलदर |
|---|---|---|---|
| अ | आश्वासित पाणी पुरवठा | मोठे / मध्यम जलाशय / मोठया व मध्यम प्रकल्पावरील कालवा उपसा / कालवा नसलेले साठवण तलाव | मूळ दर |
| ब | वहन व्ययासह नियंत्रित पाणी पुरवठा | धरणाच्या खालच्या बाजूचा नदीचा नियंत्रित भाग / जलाशयाचा आधार असलेला कोल्हापूर पध्दतीचा बंधारा/ जलविद्युत् केंद्रातील अवजल | प्रत्यक्ष उचललेल्या पाण्यास मूळ दराच्या दोन पट |
| क | अंशतः आश्वासित पाणी पुरवठा | कालवा असलेला लहान जलाशय / जलाशयाचा आधार नसलेला कोल्हापूर पध्दतीचा बंधारा / को.प. बंधारा वा बंधारा नसलेली अनियंत्रित नदी | मूळ दराच्या ५० % |
| ड | पाणी वापरकर्त्या ***गटाने / संस्थेने*** पायाभूत सुविधा निर्मितीतील (जलाशय इ.) ***प्रमाणशीर खर्चाचा वाटा उचलला असेल*** | पाणी वापरकर्त्या गटाने (पाणी प्रक्रियेसाठी वापरणारा उद्योग वा पाणी कच्चामाल म्हणून वापरणारा उद्योग) धरण/बंधारा/ कोल्हापूर पध्दतीचा बंधारा यांच्या प्रमाणशीर खर्चाचा वाटा उचलला असेल | खालील टीप पहावी |

| अ. क्र. | वर्गवारी | पुरवठ्याचा स्त्रोत | ***अनुज्ञेय*** जलदर |
|---|---|---|---|
| इ | पाणी वापरकर्त्या गटाने पायाभूत सुविधा (जलाशय इ.) निर्माण केली असेल ***व देखभाल दुरुस्ती करत असेल तर*** | पाणी वापरकर्त्या गटाने (ग्रामपंचायत, नगरपालिका, महानगरपालिका व तत्सम संस्था) धरण/बंधारा/ कोल्हापूर पध्दतीचा बंधारा स्वखर्चाने बांधला असेल | ***मूळ दराच्या ३३%*** |
| फ | ***नगरपालिका अथवा महानगरपालिकांचे प्रक्रियायुक्त / प्रक्रियारहित पाणी वाटप केलेले पाणी वापरकर्ते गट*** | नगरपालिका अथवा महानगरपालिकांचे________द्वितीयतः प्रक्रियायुक्त पाणी वाटप केलेले प्रक्रिया उद्योग. | ***नपा / मनपा यांनी प्रकरणनिहाय प्राधिकरणाकडून सांडपाण्याचे पुनर्वापराचे दर ठरवून घ्यावेत.*** |

**टीप** :- १) वहनव्यय वापरकर्त्यांनी सोसावयाचा आहे. बाष्पीभवनव्यय जलसंपदा विभागाने सोसावयाचा आहे.

२)पायाभूत सुविधांचा पूण खर्च / ***प्रमाणशीर खर्च*** उचलण्याबाबत जुन्या कराराने बध्द असल्यास अथवा नवीन प्रकल्पांच्या नियोजनाच्या टप्प्यात सहमती झाल्यानुसार पायाभूत सुविधांचा प्रमाणशीर खर्चाचा वाटा उचलावयाचा असल्यास अथवा एखाद्या पाणी वापरकर्त्या गटाने धरणाच्या खालील बाजूस पाणी उचलण्यासाठी बंधारा / बांध बांधला असेल तर अनुज्ञेय दराच्या ३३ टक्के दर आकारले जातील. परंतु ***नवीन करारांकरीता*** पूर्ण झालेल्या धरणातून मंजूर केलेल्या पाणी कोटयाचेबाबत प्रमाणशीर खर्चापैकी दिलेली कोणतीही रक्कम ही आगाऊ पाणीपट्टी समजण्यात येईल आणि मूळ दराच्या ३३ टक्के सवलतीच्या दरानुसार व १० टक्के व्याज दरानुसार धरणाची / बंधाऱ्याची निव्वळ सांप्रत किंमत वळती होईपर्यंत येणाऱ्या कालावधीकरिता पाणीपट्टी आगाऊ भरल्याचे समजण्यात येईल. आगाऊ पाणीपट्टीची पूर्ण रक्कम वळती झाल्यानंतर योग्य तो मूळ दर अनुज्ञेय होईल.

३) जेव्हा नगरपालिका / महानगरपालिका एखाद्या पाणी वापर गटास प्रक्रियारहित सांडपाणी देईल (जर याबाबत खालच्या अंगास त्याच्या वापराची कोणतीही पूर्व अट नसेल तर) हे सांडपाणी गोळा करण्यासाठी व वाहून नेण्याकरिता त्याच कामासाठी केवळ स्वतंत्र पाईपलाईन वापरणाऱ्या संस्थेने टाकली पाहिजे जेणेकरुन नैसर्गिक प्रवाहामध्ये दुषित सांडपाणी मिसळले जाणार नाही.

(दोन) मूळ दर हे रबी हंगामाकरिता लागू असतील. खरीप हंगामाकरिता मूळ दराच्या ५० टक्के दर आकारण्यात येईल आणि उन्हाळी हंगामासाठी मूळ दराच्या १५० टक्के दर आकारण्यात येईल. ***स्त्रोतनिहाय अनुज्ञेय दरासही हे तत्व लागू राहील.***

(तीन) मूळ दर, प्रक्रिया उद्योगांस म्हणजेच (औष्णिक विद्युत केंद्राप्रमाणे) शीत प्रक्रियेसाठी पाणी वापर करणारे उद्योग वा स्वच्छतेसाठी पाणी वापरणारे उद्योग आणि अपेक्षित उत्पादनाच्या निर्माण प्रक्रियेमध्ये पाणी वापरणाऱ्या उद्योगांना अनुज्ञेय असतील.

(चार) पाण्याचा कच्चा माल म्हणून वापर करणाऱ्या उद्योगांकरिता म्हणजेच बाटलीबंद पाणी, शीतपेये, ऊस प्रक्रिया उद्योग (इथेनॉल व मध्यार्क तसेच सहउर्जानिर्मिती करणारे) इत्यादी सारख्या उद्योगांकरिता ***अनुज्ञेय*** दराच्या पाच पट दर आकारण्यात येईल.

(पाच) औद्योगिक वापरकर्त्यांबरोबर ठोक पाणी पुरवठा करार करताना घरगुती वापराचे प्रमाण निश्चित केले जाईल व त्यासाठी उचित घरगुती दर आकारण्यात येईल.

**१३.३.२ सूट**

(एक) कृषी आधारित उद्योग [कुक्कुट पालन, कॅनिंग, दुग्धव्यवसाय साखर, (अल्कोहोल उत्पादन व सहउर्जा उत्पादन वगळून), मका प्रक्रिया (अल्कोहोल उत्पादन वगळून), भात गिरण्या, वनस्पतीजन्य तेले] लागू असलेल्या दराच्या ७५ टक्के दर आकारण्यात येईल.

(दोन) पुनर्प्रक्रियायुक्त वापरासाठी सूट – जर एखादा उद्योग पाण्याचा पुनर्प्रक्रियायुक्त वापर (वापर २५ टक्क्यांपर्यंत कमी करुन) मागणी ७५ टक्के पर्यंत कमी (घट) करत असेल तर लागू असलेल्या दराच्या ७५ टक्के दर ***त्यांनी वापरलेल्या पाण्यास*** आकारण्यात येईल. याकरिता जलसंपदा विभागाकडून अशी घट पडताळणीची तपासणी यंत्रणा विकसित करण्यात येईल.

(तीन) शून्य विसर्गाचे उद्योग – जर एखादा प्रक्रिया उद्योग शून्य विसर्ग तंत्राचा अवलंब करीत असेल आणि त्यामुळे वहन यंत्रणेतीत तूट, बाष्पीभवन आणि प्रक्रियेतील वापर यांकरिता मंजूर कोटयाच्या फक्त १५ टक्के पर्यंत पाणी घेत असेल तर त्यांनी घेतलेल्या पाण्यास अनुज्ञेय दराच्या २५ टक्के दर आकारला जाईल.

### १३.३.३ शास्ती/दंड

(एक) “प्रदूषण करणाऱ्याने किंमत चुकवावी” तत्त्व : प्रत्येक उद्योगाने, नैसर्गिक पाण्याच्या प्रवाहात उत्सर्जित पाणी सोडण्यापूर्वी त्या पाण्यावर म.प्र.नि.मं.च्या प्रमाणकानुसार उचित प्रक्रिया करणे अपेक्षित आहे, अशा प्रकरणात लागू असलेला दर आकारण्यात येईल. प्रदूषण करण्याची प्रवृत्ती रोखण्याकरिता आरंभीचे पाऊल म्हणून, जर म.प्र.नि.मं.च्या आवश्यक त्या प्रमाणकानुसार उत्सर्जित पाण्यावर उचित प्रक्रिया केली नसेल तर अशाप्रकरणी लागू असलेल्या दराच्या दुप्पट दराने दर आकारणी करण्यात येईल. ***तथापि असे दुप्पट दर आकारण्यापूर्वी शा.नि.क्र.पापव-२०१३/(प्र.क्र.४६६ /२०१३)/सिं.व्य.(महसूल) दि.१२/११/२०१३ नुसार कार्यपध्दती म्हणजेच औद्योगिक वापरकर्त्यांनी म.प्र.नि.मंडळाकडून प्रमाणपत्र घेऊन जलसंपदा विभागास देणे, न दिल्यास ३ महिन्यांपर्यंत ५ टक्के ज्यादा दर आकारणे व त्यानंतर पाणीपुरवठा खंडीत करण्याची ३ महिन्याची नोटीस देणे व त्या कालावधीत दुप्पट दर आकारणे आणि त्यानंतर पुरवठा खंडीत करणे इ. याशिवाय जलसंपदा विभागाचे अधिकारी अचानकरित्या औद्योगिक वापरकर्त्याच्या प्रतिनिधीच्या उपस्थितीत वापरानंतर नदी/नाल्यात सोडावयाच्या उत्सर्जित (Effluent) पाण्याचे नमुने म.प्र.नि.मं.च्या पुरस्कृत / मान्यता असलेल्या प्रयोगशाळेकडून दर तीन महिन्यात एकदा तपासणी करणे याप्रमाणे अवलंबिण्यात यावी.*** म.प्र.नि.मं.कडून स्वतंत्रपणे पुढे होणाऱ्या कार्यवाही व्यतिरिक्त ही कार्यवाही असेल.

### १३.३.४ औद्योगिक दर परिगणित करण्याची पध्दत

(एक) निकषाच्या परिच्छेद १२.४ नुसार सन २०१४-१५ करिताच्या प्रचालन व परिरक्षण खर्चाच्या ***५५ टक्के*** वाटा उद्योगासाठी देय ठरतो.

(दोन) या विभागणी केलेल्या खर्चानुसार ***२०१३-१४ च्या अंदाजित खर्चावर मूळ दर आधारित असेल. पुढील वर्षांसाठी प्रतिवर्ष १० टक्के वाढ करुन दर आकारण्यात येतील.***

(तीन) अनुमानित केलेला एकूण पाणी वापर दोन प्रवर्गांमध्ये म्हणजेच प्रक्रिया उद्योग आणि पाणी कच्चा माल म्हणून वापरणारे उद्योग यामध्ये विभागण्यात येईल. प्रत्येक उपप्रवर्गातील वापर निकषाच्या परिच्छेद १३.३.१ (एक) नुसार पुरवठयाच्या स्त्रोताच्या वर्गवारीनुसार विभागण्यात येईल. या विभागणीसाठी वापरण्यात आलेली टक्केवारी ही पूर्व तपशीलाच्या सरासरीवर आधारित असेल अथवा योग्यरित्या अंदाजित केलेली असेल.

(चार) सरासरी दराचा अवलंब करुन परिगणित करण्यात येणाऱ्या एकूण प्राप्त महसूलाचे अनुमान विविध उपप्रवर्गातील व पुरवठयाच्या स्त्रोताधारे अंदाजित केल्या जाणाऱ्या महसूलाच्या सहाय्याने करता येईल. प्रचालन व परिरक्षण खर्चाचे वाटप आणि महसूल निर्मितीची आकडेवारी याचा मेळ जमेपर्यंत सरासरी दर अधिक वा कमी करण्यात येईल आणि असा आलेला दर मूळ दर म्हणून राहील.

(पाच) सवलतीच्या प्रदानामुळे येणारी महसूलातील तूट आणि दंडामुळे होणारी महसूलातील वाढ दर ठरविण्याच्या टप्प्यावर विचारात घेतली जाणार नाही.

## १३.४ अन्य तरतुदी (घरगुती आणि औद्योगिक वापर यासाठी सामायिक)

(एक) विहित कालावधीनंतर विलंबाने देयक भरल्यास दरमहा १ टक्के अथवा १२ टक्के प्रतिवर्षी प्रमाणे आकारण्यात येईल.

(दोन) भविष्यातील करारासाठी बिगरसिंचन हक्कदारीकरिता प्राधिकरणाने निश्चित केलेले निकष वापरण्यात येतील.

(तीन) करारामध्ये नमूद केलेल्या विहित परिमाणाच्या १० टक्केहून अधिक वापरलेल्या पाण्यासाठी अनुज्ञेय दराच्या दीडपट दंडनीय दर आकारण्यात येईल.

(चार) जलसंपदा विभागाशी करारनामा करताना बिगरसिंचन पाणीवापरकर्ते अंतिम पाणी मागणी प्रमाणे टप्प्याटप्याने पाणीवापर करण्याचे नियोजन नमूद करू शकतील. नियोजनानुसार वापरलेल्या पाण्यास वरील ३ आणि ४ प्रमाणे दंडनीय आकारणीचे अधीन राहून पाणीपट्टी आकारण्यात येईल. उर्वरित परिमाणास (म्हणजे अंतीम मागणी वजा विशिष्ट वर्षात नियोजनानुसार दर्शविलेले परिमाण) ५ टक्के प्रमाणे बांधीलकी शुल्क आकारले जाईल.

(पाच) करारामध्ये नमूद केलेल्या विहित परिमाणाच्या १० टक्केहून कमी वापरलेल्या पाण्यासाठी अनुज्ञेय दराच्या दीडपट दंडनीय दर आकारण्यात येईल. **परिशिष्ट २** नुसार बांधीलकी शुल्क आणि दंडनीय दर काढण्याची पध्दत दिली आहे.

शिल्लक परिमाण (पाणी) अन्य कोणत्याही वर्गातील वापरकर्त्यास अथवा त्याच वर्गातील अन्य वापरकर्त्यास वर नमूद केलेल्या करारातील वापरकर्त्यांच्या हक्कदारीस बाधा येऊ न देता वळविण्यास जलसंपदा विभागास स्वातंत्र्य असेल.

## १४.० सेवा पुरवठादारांच्या जबाबदाऱ्या

१४.१ सन २०१०-१३ साठीच्या पाणी प्रशुल्क निर्धारणाच्या निकषामध्ये (परिशिष्ट-५ व ६) सेवा पुरवठादारांवर (जलसंपदा विभाग) पुढील बाबींशी संबंधित काही जबाबदाऱ्या टाकण्यात आलेल्या होत्या. सोबतचे **परिशिष्ट ५ व ६** पहावे.

१) लाभक्षेत्रातील पुच्छ भागातील शेतकऱ्यांना पाणी मिळण्याची हमी देणे
२) पाणीवापर कार्यक्षमतेमध्ये सुधारणा
३) मत्ता व्यवस्थापन
४) कालवा प्रणालीतील वहन व्ययाचे निर्धारण.

या जबाबदाऱ्या सेवा पुरवठादारांवर सन २०१३-१६ दरम्यान सुध्दा राहणार आहेत.

१४.२ जागतिक बँकेच्या सहाय्य अंतर्गत महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्पाखाली २३६ सिंचन प्रकल्पांची पुनर्स्थापनेची कामे सुरु असून ती २०१४ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित

आहे. त्यानंतर या प्रकल्पांवरील लाभक्षेत्रात कालव्याच्या मुखाकडील पाणी वापर संस्थांना होणारा पाणी पुरवठा व पुच्छ भागातील पाणी वापर संस्थांना होणारा पाणी पुरवठा यामध्ये समन्याय रहाणे अपेक्षित आहे. महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्पात अंतर्भूत नसलेल्या अन्य सिंचन प्रकल्पांपैकी निवडक मोठया व मध्यम प्रकल्पांच्या लाभक्षेत्रात कालव्यांच्या मुखाकडील, मध्य भागाकडील तसेच पुच्छ भागाकडील साध्य झालेल्या सिंचनाच्या टक्केवारीची माहिती जलसंपदा विभागाने सन ***२०१३-१४*** पासून सिंचन स्थिती दर्शक अहवालामध्ये अंतर्भूत करावी.

१४.३ पाणी वापर कार्यक्षमतेमध्ये म्हणजेच प्रति दलघमी पाण्याद्वारे सिंचित होणा-या क्षेत्रामध्ये (हेक्टर/दलघमी) सुधारणा होण्यासाठी प्राधिकरणाने सन २०१०-१३ च्या ठोक पाणी प्रशुल्क निर्धारणाच्या निकषामध्ये २०१०-११, २०११-१२ व २०१२-१३ या वर्षासाठी अनुक्रमे १२० हेक्टर/दलघमी, १२५ हेक्टर / दलघमी व १३० हेक्टर / दलघमी अशी उद्दिष्टयें ठेवली होती. जरी मागील काही वर्षात पाणी वापर कार्यक्षमतेत वाढ होत असल्याचे दिसून येत असले तरी सन २०१०-११ व ***२०११-१२ च्या*** कार्यक्षमतेतील सुधारणा संबंधी पृथःकरण ***सोपेकॉम या संस्थेने केले आणि त्याबाबतचा संक्षिप्त अहवाल प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर ठेवला आहे. सन २०१३ ते २०१६ करीता किमान १३० हेक्टर / दलघमी चे लक्ष ठरविले आहे.***

१४.४ सन २०१०-१३ च्या ठोक पाणी प्रशुल्क निर्धारणाच्या निकषामध्ये ***सर्व संवर्गातील प्रकल्पांच्या पाणी वापर संस्थेने शासनाकडे जमा केलेल्या पाणीपट्टी पैकी प्राधिकरण कायद्यातील कलम ११(द) नुसार कालवे प्रणालीस कोणताही धोका पोचू नये म्हणून ९५ टक्के अनुदान देखभाल व दुरुस्तीसाठी संस्थेस परत देण्याचे प्राधिकरणाने निर्देश दिले होते. जलसंपदा विभागाकडून या बाबत सुधारित शासन निर्णय अद्याप निर्गमित झाला नसल्यामुळे तो एक महिन्यात निर्गमित होणे आवश्यक आहे. तसेच सन २०१४-१५ या आर्थिक वर्षी याची एक रकमी तरतूद करावी व पाणी वापर संस्थेस हे अनुदान हंगामापूर्वी मिळेल हे पहावे.***

१४.५ ***काही*** प्रकल्पांमध्ये वरिष्ठ स्तरावरील संस्था (प्रकल्प स्तर, कालवा स्तर, वितरिका स्तर) स्थापन ***झाल्या असल्यातरी नेमून दिलेली कामे पार पाडण्यास त्या पुरेशा सक्षम नसल्यामुळे*** लघुवितरिके च्या वरच्या प्रणालीच्या देखभाल दुरुस्तीची जबाबदारी जलसंपदा विभागाकडेच राहील. ज्या प्रकल्पांमध्ये अशा वरिष्ठ स्तरावरील संस्था ***पुरेशा सक्षम झाल्या आहेत आणि पाणी वापर संस्थांच्या वतीने पाणी घेतात अशा*** वरिष्ठ स्तरावरील संस्थांकडून त्यांच्या अखत्यारीतील सर्व पाणी वापर संस्थांकरिता लघुवितरिका स्तरावर लागू असलेल्या ठोक पाणी प्रशुल्काची आकारणी करण्यात येईल. ***अशा कालवे प्रणाली सुस्थितीत राखणाऱ्या*** वरिष्ठ स्तरावरील संस्थेला लघुवितरिका स्तराच्या वरच्या प्रणालीच्या देखभाल दुरुस्तीसाठी ***शासन निर्णय क्र.संकीर्ण-२००७/(१३/०७)/सिंव्य (कामे)दि.२७/८/२०१३ नुसार दिलेल्या*** स्तरनिहाय ***(मुख्य कालवा / वितरिका / लघुवितरिका)*** मापदंडानुसार जलसंपदा विभागाकडून अनुदान दिले जाईल.

१४.६ जलसंपदा विभागाद्वारे निश्चित केलेल्या प्रकल्पांच्या कालवे प्रणालीतील वहनव्यय मोजण्याचे काम ***वाल्मी, औरंगाबाद मार्फत चालू झालेले आहे. याबाबत काही निर्ष्कषाला येण्यासाठी किमान ३ वर्षांची निरीक्षणे आवश्यक वाटतात. यास्तव हे काम २०१३-१४ मध्ये निरीक्षणे घेऊन पूर्ण करण्यात येईल*** सदर उपक्रम सातत्याने चालू ठेवण्याची जलसंपदा विभागाची जबाबदारी राहील.

१४.७ सर्व मोठया व मध्यम प्रकल्पांच्या ठिकाणी कृषी - हवामानविषयक केंद्रे स्थापन होतील याची जलसंपदा विभागाने खात्री करावी व दैनंदिन पर्जन्यमान बाष्पीभवनव्यय या विषयी सातत्याने माहिती गोळा करावी. जलसंपदा विभागाने, गाळ साठण्यामुळे जलाशयामध्ये होणारा अचल साठा आणि उपयुक्त साठा यातील घट निश्चित करण्यासाठी मोठया प्रकल्पांच्या जलाशयाचे नियमितपणे गाळ सर्वेक्षण करावे.

## परिशिष्ट - १

**(परिच्छेद क्र. १३.१.१ (पाच))**

## लघुवितरिका स्तरावरील पाणी वापर संस्थेकरिता कृषिसिंचनासाठी पाणी वापराचे घनमापन दर परिगणित करण्याची पध्दत

(सन २०१४-१५ साठी अंदाजित केलेल्या आकडेवारीनुसार परिगणना करावी.)

१. गृहीतके - महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्पातील बहुतेक प्रकल्पांच्या प्रणालीची पुनर्स्थापना कामे सन २०१४-१५ पर्यंत पूर्ण होणार असल्याने एकंदर कार्यक्षमता ०.४८ व लघुवितरिकेपर्यंतची कार्यक्षमता ०.६४ घेतली आहे.

२. सिंचन प्रणालीच्या प्रचालन व परिरक्षण खर्चाचा भाग 'C' मानू.

३. सिंचनासाठी मुख्य कालव्याच्या मुखाशी वापरलेले एकूण घनमापित पाणी '$V_1$' मानू.

४. लघुवितरिकांमध्ये पाणी वापर संस्थांकडून (लघुवितरिका मुखाशी) वापरलेले एकूण घनमापित पाणी $V_2$ मानू.

५. कालव्याच्या मुखाशी पाणी वापर संस्थेसाठी सोडलेले पाणी = $V_2$/०.६४ = $V_3$ (समजा.)

६. पाणी वापर संस्थांचा प्रचालन व परिरक्षण खर्चाचा भाग = $C \times \frac{V_3}{V_1} = C_1$

७. पाणी वापर संस्थांसाठी घनमापन पुरवठयाचा दर = $\frac{C_1}{V_3} = \frac{0.64\ C_1}{V_2}$

टीप : आवश्यकता वाटल्यास वरील दरात २५ % सवलत देण्याचा विचार करता येईल.

८. हा दर रबी हंगामाचा असेल. खरीपासाठी घनमापन दर रबी हंगामाच्या दराच्या ५० % तर उन्हाळी हंगामासाठी ***१५० %*** प्रस्तावित केला आहे.

**टीप** :- १) सेवा पुरवठादाराने वहनव्ययाचा भार सोसावयाचा आहे यानुसार ही पध्दत आहे.

२) वरील पध्दत बिगर-भात क्षेत्रासाठी आहे. भातक्षेत्रासाठी निकष परिच्छेद १३.१.४.१ (तीन) पहावा.

# परिशिष्ट - २

(परिच्छेद क्र. १३.४)

## बांधीलकी शुल्क व दंडनीय आकारणी यांची अंमलबजावणी (स्पष्टीकरणात्मक उदाहरण)

**बांधीलकी शुल्क :-**

समजा एका वापरकर्त्या गटाने ५ वर्षांकरिता १०० दलघमी बिगर सिंचन पाणी वापरासाठी जलसंपदा विभागाशी करारनामा केला आहे. त्या वापरकर्त्यास १०० दलघमी पाणी ४ थ्या वर्षापासून लागणार आहे व पहिल्या ३ वर्षातील त्याची गरज अनुक्रमे ५०, ६० व ८० दलघमी आहे. ही टप्पानिहाय पाण्याची गरज करारनाम्यात नमूद केली जाईल.

सदर पाणी वापराची प्रशुल्क आकारणी पुढीलप्रमाणे राहील.

| | | |
|---|---|---|
| १. | वर्ष एक | ५० X अनुज्ञेय दर + उर्वरित ५० वर अनुज्ञेय दराच्या ५% प्रमाणे बांधीलकी आकार |
| २. | वर्ष दोन | ६० X अनुज्ञेय दर + उर्वरित ४० वर अनुज्ञेय दराच्या ५% प्रमाणे बांधीलकी आकार |
| ३. | वर्ष तीन | ८० X अनुज्ञेय दर + उर्वरित २० वर अनुज्ञेय दराच्या ५% प्रमाणे बांधीलकी आकार |
| ४. | वर्ष चार व पाच | १०० X अनुज्ञेय दर |

**दंडनीय आकारणी:-**

तथापि उपरोक्त टप्पेनिहाय परिमाणानुसार प्रत्यक्ष पाणी वापर झाला नसेल व त्यात ± १०% पेक्षा जास्त तफावत असेल तर खाली दिल्याप्रमाणे १.५ पट दंडनीय प्रशुल्क आकारण्यात येईल.

(१) समजा पहिल्या वर्षी ५० ऐवजी ६० वापर झाला असेल. हा वापर + १०% या मंजूर तफावतीनुसार येणाऱ्या ५५ पेक्षा जादा आहे. त्यास प्रशुल्क आकारणी खालीलप्रमाणे होईल.

५५ x अनुज्ञेय दर + ५ x अनुज्ञेय दराच्या १.५ पट दर + ४० x अनुज्ञेय दराच्या ५% प्रमाणे बांधीलकी आकार

(२) समजा दुसऱ्या वर्षी ६० ऐवजी फक्त ५० वापर झाला असेल. हा वापर १० ने कमी आहे. मंजूर कमी वापर हा -१०% म्हणजे फक्त ६ असून एकूण ५४ पर्यंत वापरावर दंडनीय आकार लागू राहणार नाही. प्रकल्पातील १० परिमाणाचे पाणी विनावापर राहिल्यामुळे त्यावर दंडनीय आकारणी होईल. प्रशुल्क आकारणी पुढीलप्रमाणेः

५४ x अनुज्ञेय दर + ६ x अनुज्ञेय दराच्या १.५ पट दर + ४० x अनुज्ञेय दराच्या ५% प्रमाणे बांधीलकी आकार.

## परिशिष्ट - ३

### (परिच्छेद क्र. १३.१.१(सहा))

### खाजगी उपसा सिंचन योजनांच्या क्षेत्राधारित व ठोक जलदर निश्चिती करिता पध्दत

१) ऊस, केळी, फळबागा यासाठीचे दर खालीलप्रमाणे परिगणित करण्यात येतील.

२) पुरवठयाच्या स्त्रोतानुसार दर लागू होतील. पुरवठयाच्या स्त्रोतानुसार पुढीलप्रमाणे वर्गवारी राहीलः

| अ.क्र. | वर्गवारी | पुरवठयाचा स्त्रोत | ***अनुज्ञेय*** दर |
|---|---|---|---|
| (अ) | आश्वासित पाणी पुरवठा | मोठे/मध्यम जलाशय/मोठया व मध्यम प्रकल्पावरील कालवा उपसा/कालवा नसलेले साठवण तलाव | मूळ दर |
| (ब) | वहन व्ययासह नियंत्रित पाणी पुरवठा | धरणाच्या खालच्या बाजूचा नदीचा नियंत्रित भाग/जलाशयाचा आधार असलेला कोल्हापूर पध्दतीचा बंधारा/जलविद्युत केंद्रातील अवजल | मूळ दराच्या ०.७५ पट |
| (क) | अंशतः आश्वासित पाणी पुरवठा | कालवा असलेला लहान जलाशय/जलाशयाचा आधार नसलेला कोल्हापूर पध्दतीचा बंधारा/कोणताही कोल्हापूर पध्दतीचा बंधारा अथवा बंधारा नसलेली अनियंत्रित नदी | मूळ दराच्या ०.५० पट |
| (ड) | पाणी वापरकर्त्या ***गटाने / संस्थेने*** जलाशयाची प्रमाणशीर खर्चाचा वाटा उचलला असेल | पाणी वापर संस्थेने/उपसा सिंचन योजनेच्या संस्थेने धरण/बंधारा/कोल्हापूर पध्दतीचा बंधारा त्याच्या प्रमाणशीर खर्चाचा वाटा उचलला असेल | खालील टीप पहावी. |
| (इ) | पाणी वापरकर्त्या ***संस्थेने / गटाने*** पायाभूत सुविधा (जलाशय इ.) निर्माण केली असेल ***व देखभाल दुरुस्ती करीत असेल तर*** | पाणी वापरकर्त्या गटाने (ग्रामपंचायत, नगरपालिका, महानगरपालिका व तत्सम संस्था) धरण/बंधारा/ कोल्हापूर पध्दतीचा बंधारा स्वखर्चाने बांधला असेल | मूळ दराच्या ३३ % |
| टीप :- | पायाभूत सुविधांचा पूण खर्च / ***प्रमाणशीर खर्च*** उचलण्याबाबत जुन्या कराराने बध्द असल्यास अथवा नवीन प्रकल्पांच्या नियोजनाच्या टप्प्यात सहमती झाल्यानुसार पायाभूत सुविधांचा प्रमाणशीर खर्चाचा वाटा उचलावयाचा असल्यास अथवा एखाद्या पाणी वापरकर्त्या गटाने धरणाच्या खालील बाजूस पाणी उचलण्यासाठी बंधारा / बांध बांधला असेल तर अनुज्ञेय दराच्या ३३ टक्के दर आकारले जातील. परंतु ***नवीन*** | | |

| | |
|---|---|
| | ***करारांकरीता*** पूर्ण झालेल्या धरणातून मंजूर केलेल्या पाणी कोटयाचेबाबत प्रमाणशीर खर्चापैकी दिलेली कोणतीही रक्कम ही आगाऊ पाणीपट्टी समजण्यात येईल आणि मूळ दराच्या ३३ टक्के सवलतीच्या दरानुसार व १० टक्के व्याज दरानुसार धरणाची / बंधाऱ्याची निव्वळ सांप्रत किंमत वळती होईपर्यंत येणाऱ्या कालावधीकरिता पाणीपट्टी आगाऊ भरल्याचे समजण्यात येईल. आगाऊ पाणीपट्टीची पूर्ण रक्कम वळती झाल्यानंतर योग्य तो मूळ दर अनुज्ञेय होईल. |

३) खाजगी उपसा सिंचन योजनेच्या मालकाने मोटर, पंप, पाईपलाईन यासारख्या पायाभूत सुविधांवर केलेल्या गुंतवणीप्रीत्यर्थ खाजगी उपसा सिंचन योजनेस ३५ % सूट दिली जाईल.

४) वार्षिक उर्जा खर्च हा ५ अश्वशक्तीच्या पंपासाठी रु. १६७० प्रति हेक्टर यानुसार विचारात घेण्यात येईल.

५) खाजगी उपसा सिंचन योजनेच्या मालकाने मोटर, पंप, पाईपलाईन यांच्या प्रचालन व परिरक्षण या प्रीत्यर्थ केलेला वार्षिक खर्च रु. १००० प्रति हेक्टर यानुसार विचारात घेण्यात येईल.

६) ऊस व केळी या पिकांकरिता मूळ दर पुढील सुत्रानुसार काढण्यात येईल.
मूळ दर (जवळच्या १० रुपयात पूर्णांकित केलेला) रु / हेक्टर
= ०.६५ X (ऊस, केळी या पिकांचा प्रवाही दर) – १६७० – १०००

७) फळबागांसाठी प्रवाही पध्दतीने सिंचनाचा दर हा ऊस व केळी या पिकांसाठीच्या दराच्या ७५ % इतका असेल.

८) ठिबक, तुषार या सारख्या सिंचनाच्या आधुनिक पध्दतींचा अवलंब केल्यास लागू दरावर ***२५*** % सूट दिली जाईल.

९) हा दर रबी हंगामाचा असेल. खरीपासाठी घनमापन दर रबी हंगामाच्या दराच्या ५०% तर उन्हाळी हंगामासाठी ***१५० %*** प्रस्तावित केला आहे.

***१०)*** खाजगी उपसा चालकाने (व्यक्तिशः अथवा पाणी वापर संस्था) ***तसेच ज्यांनी पायाभूत सुविधा स्वखर्चाने निर्माण केली असेल व त्याची देखभाल करीत असेल अशांनी*** घनमापित पध्दतीने मोजून पाणी उचलले असेल तेव्हा वर नमुद केलेल्या क्षेत्राधारीत स्त्रोतनिहाय अनुज्ञेय दराच्या ७५% प्रमाणे क्षेत्राधारीत आकारणी करावी. ***परंतू संबंधित गट / संस्था हे घनमापन पध्दतीने पाणी घेत असले बाबत संबंधित उप-अभियंता यांनी महिन्यातून एकदा व कार्यकारी अभियंता यांनी हंगामात एकदा तपासणी करणे बंधनकारक राहील.***

## परिशिष्ट - ४

(परिच्छेद क्र. १३.१.१.(सात))

### *महाराष्ट्र शासनाच्या मालकीच्या उपसा सिंचन योजनांकरिता उर्जा आकारासह प्रकल्पनिहाय जलदर निश्चित करणेसाठीची पध्दती*

*१. कृष्णा खोऱ्यातील सन २००५-०६ पासून कार्यान्वित असलेल्या व वेगवेगळ्या उंची असलेल्या म्हैसाळ, ताकारी व सिना-म्हाडा या उपसा सिंचन योजनांपासून मिळालेल्या अनुभवावर आधारीत पध्दती विकसित केलेली आहे. प्रकल्प अधिकाऱ्यांनी या प्रत्येक योजनेच्या परीचालनाची प्रत्यक्षातील माहिती पुरविली आहे. प्राधिकरणाने वीज आकार, सिंचित क्षेत्र, दर हेक्टरी महसुल आकारणी यांचा तपशील असलेले एक नमुना वर्ष विचारात घेतले आहे. या माहितीवर आधारीत पाणी वापर संस्था नसलेल्या क्षेत्रा करीता खालील पध्दत पाणीवापर संस्था स्थापन होईपर्यंत विहित करण्यात आली आहे.*

*२. हंगामाच्या प्रारंभी प्रकल्प अधिकारी सिंचनाची संभाव्य मागणी व येणाऱ्या वीज देयकांच्या आधारे लागू करावयाचे संभाव्य वीज आकार यांचा अंदाज घेतात. (i) वीज आकार व (ii) पीकवार सिंचन आकार (सध्या अस्तित्वात असलेले शासन मंजूर दर अधिक २० टक्के स्थानिक उपकर व अन्य किरकोळ उपकर/आकार) अंतर्भुत असलेला प्रती हेक्टरी प्रती पाणीपाळीचा दर निश्चित केला जाऊन त्यास संबंधित मुख्य अभियंत्यांची मंजुरी घेतली जाते. शेतकऱ्यांना या दरांची माहिती देण्यात येते. (काही योजनांत या दरावर आधारीत आगाऊ रक्कमही स्विकारली जाते.)*

*३. प्रत्यक्ष जल दर ठरविण्याकरिता अनुसरावयाची कार्यपध्दती*

- *म.रा.वि.मं. च्या अधिकाऱ्यांकडून संबंधीत प्रकल्प अधिकाऱ्यांना, प्रत्यक्ष वीज वापरानुसार प्राप्त झालेल्या एकूण वीज आकाराच्या आधारे योजनानिहाय दर हेक्टरी सिंचनाचे वीजदर निश्चित केले जातात.*

- *राज्य शासनाने हंगामवार, पीकवार निश्चित केलेल्या दरहेक्टरी सिंचनाच्या दरानुसार (२० टक्के स्थानिक उपकरांसह) प्रत्यक्ष सिंचन क्षेत्र व पाणी पाळ्यांची संख्या या आधारे आकारणी केली जाते.*

- *प्रती हेक्टरी वीज आकारासह प्रती हेक्टरी पाणीदर आणि प्रती हेक्टरी २० टक्के स्थानिक उपकरांसह सिंचनाचे प्रती हेक्टरी दर यांच्या आधारे एकूण दर ठरविण्यात येऊन वसुली करण्यासाठी या दराचे रुपांतर प्रती हेक्टरी प्रती पाणीपाळी मध्ये करण्यात येते.*

- *योजना निरंतर चालू रहावी यासाठी, उपसा सिंचन योजनांखालील जास्तीत जास्त क्षेत्र सिंचनाखाली आणले गेले पाहिजे. जेणेकरून वापरदारांना दर हेक्टरी कमीतकमी वीज आकार लागू होऊ शकेल. सर्व पाणीवापरदारांकडून वीज आकाराची संपूर्ण वसुली होईल, हे ध्येय असले पाहिजे.*

- *शासनातर्फे चालविल्या जाणाऱ्या उपसा सिंचन योजनांसाठीचे पाणीदर योजना निहाय असावेत. म्हणून उपशाचा प्रकार व खर्ची पडणारी वीज लक्षात घेऊन प्रत्येक योजनेसाठी वेगळे दर ठरविले जातील.*

*लाभक्षेत्रात जशा आणि जेव्हा पाणीवापर संस्था स्थापन होतील तेव्हा घनमापन पध्दतीने पाणी पुरवठा करुन प्रवाही क्षेत्रांसाठी प्राधिकरणाने निश्चित केलेले घनमापनाचे दर व प्रत्यक्ष सिंचीत क्षेत्रानुसार यथाप्रमाण प्रती हेक्टरी वीज आकाराच्या आधारे पाणीदर पाणीवापर संस्थेस लावले जातील.*

*४. पाणी उचलून तलावात / पाझर तलावात सोडणाऱ्या ज्या उपसासिंचन योजना शासनातर्फे चालविल्या जातात अशा उपसासिंचन योजनांच्या वीज आकाराची लाभधारकांकडून वसूली करण्यासाठीं अनुसरावयाची पध्दती.*

*म.रा.वि.मं.च्या अधिकाऱ्यांकडून संबंधीत प्रकल्प अधिकाऱ्यांना, प्रत्यक्ष वीज वापरावर आधारीत प्राप्त झालेले एकूण वीज देयक व या तलावांमुळे सिंचनाचा लाभ मिळणारे एकूण क्षेत्र यांचे आधारे प्रति हेक्टरी सिंचनाचा वीज दर निर्धारित करण्यात यावा.*

# परिशिष्ट - ५

## (परिच्छेद १४.१)

## जलप्रशुल्काच्या संबंधात सेवा पुरवठादारांच्या (जलसंपदा विभाग) जबाबदाऱ्या

### १. वसुलीच्या कार्यक्षमतेत सुधारणा

प्रकरण २ मध्ये जलप्रशुल्काच्या वसुलीच्या कार्यक्षमतेच्या बाबीबद्दल विवेचन करण्यात आलेले आहे. उद्योगांच्या बाबतीत वसुलीची कार्यक्षमता ९० टक्क्यापर्यंत आहे तर पेयजलाच्या बाबतीत ती ६० ते ७० टक्क्याच्या दरम्यान आहे. ***ती २०१३-१६ कालावधीसाठी ८० ते ८५ टक्क्यांपर्यंत वाढविण्याचे उद्दिष्ट आहे.*** सिंचनाच्या बाबतीत मात्र वसुलीची कार्यक्षमता ***तुलनेत*** कमी म्हणजे ***४० ते ५० टक्क्यांच्या*** दरम्यान आहे. ***ती २०१३-१६ कालावधीसाठी ७० ते ७५ टक्क्यांपर्यंत वाढविण्याचे उद्दिष्ट आहे. जेणेकरुन पुढीलप्रमाणे वर्षवार वसुलीचे उद्दिष्ट साधले जावे –***

| | |
|---|---|
| *२०१३-१४* | *७७%* |
| *२०१४-१५* | *८०%* |
| *२०१५-१६* | *८३%* |

प्राधिकरणाला या बाबत प्रभावी संनियंत्रण करणे शक्य व्हावे यासाठी प्रत्येक पाटबंधारे प्रकल्पाच्या बाबतीत सिंचन प्रशुल्काची आकारणी व प्रशुल्क वसुली (चालू व थकबाकी विभक्तपणे) याबाबत मंडळनिहाय माहिती वर्षवार सादर करण्यात यावी.

### २. शेवटच्या भागातील शेतकऱ्यांना पाण्याची हमी देण्याबाबत

मजनिप्रा अधिनियमाच्या कलम १२(७) नुसार प्राधिकरणाने नदीखोरे अभिकरणाकडून शेवटाकडून आरंभाकडे' सिंचनाचे तत्व राबविले जात आहे किंवा नाही याची खात्री करावयाची आहे. महाराष्ट्र सिंचन पध्दतीचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन अधिनियमाच्या नियमातील कलम १८ नुसार पाणीवापर संस्थेच्या प्रत्येक सदस्याला अनुज्ञेय पाणी हक्कानुसार परिमाण मिळते आहे किंवा नाही याबाबत संनियंत्रण व खातरजमा करण्याची

जबाबदारी कालवा अधिकाऱ्याची आहे. जनसुनावणीच्या वेळी ***पाणीवापरकर्त्यांनी*** पाणीपुरवठ्यातील समन्यायी व वक्तशीरपणा पाळण्याच्या बाबीवर भर दिला. राज्यातील ९० टक्के सिंचित क्षेत्राला अजूनही पाणी पुरवठा क्षेत्राधारित होत असल्यामुळे विभागाची विशेष जबाबदारी आहे की, प्रत्येक शेतकऱ्याला सिंचनासाठी समन्यायी व वेळेवर पाणीपुरवठा झाला पाहिजे. कालव्याच्या लाभक्षेत्रात मुखाकडील, मध्य व पुच्छ भागात सिंचित होणाऱ्या क्षेत्राची टक्केवारी जवळजवळ समान असावी. दरवर्षी प्रकाशित होणाऱ्या सिंचन स्थितीदर्शक अहवालात या बाबीविषयक माहितीचा अंतर्भाव असावा. प्राधिकरणाला याचे प्रभावीपणे संनियंत्रण करता येणे शक्य व्हावे यासाठी प्रत्येक मोठ्या व मध्यम प्रकल्पाच्या बाबतीत प्रत्येक हंगामाच्या शेवटी मंडळनिहाय माहिती सादर व्हावी ज्यामध्ये प्रत्येक प्रकल्पाच्या मुखाकडील, मध्य व पुच्छ भागात सिंचित झालेल्या क्षेत्राची टक्केवारी दिलेली असावी. पाणीवापर संस्थांना घनमापनाधारित पाणीपुरवठा करताना विभागाने संस्थेच्या मागणीला अनुसरुन अनुज्ञेय पाणी हक्कानुसार पाणीपुरवठा केला जाईल याची खात्री करावी.

### ३. पाणीवापर कार्यक्षमतेमध्ये सुधारणा

जरी प्रकल्प नियोजनाच्या टप्प्यामध्ये सरसकट कार्यक्षमता ४७ ते ५० टक्के गृहीत धरलेली असते तरी प्रत्यक्षात क्षेत्रावर मिळणारी कार्यक्षमता २५ ते ३५ टक्के असते. याचा अर्थ असा की, सोडलेल्या पाण्याचा लक्षणीय भाग पाझर वा क्षेत्रावरील वहन व्ययामध्ये व्यतीत होतो. पाणीवापर कार्यक्षमतेतील सुधारणा केवळ उत्पादकतेमध्येच सुधारणा घडवून आणित नाही तर बचत केलेल्या पाण्यातून अतिरिक्त क्षेत्र सिंचित करते. याद्वारे सिंचन उपक्षेत्रापासून अधिक महसूल मिळतो आणि प्रशुल्काच्या पुनर्विलोकन व सुधारणेच्यावेळी सिंचन प्रशुल्कात कपात सुध्दा करणे शक्य होते. जलसंपदा विभागाकडून दरवर्षी प्रकाशित होणाऱ्या जललेखा अहवालावरुन असे दिसते की, राज्यातील प्रकल्पांच्या बाबतीत सरासरी पाणीवापर कार्यक्षमता प्रति दलघमी वापरलेल्या पाण्यातून सिंचीत होणारे हेक्टर मधील क्षेत्र ९४ पासून ११० पर्यंत वाढलेले आहे. कार्यक्षमता वाढीची ही स्थिती राखली गेली पाहिजे आणि जलसंपदा विभागाकरीता ***सन २०१३ ते २०१६ करीता किमान १३० हेक्टर / दलघमी चे लक्ष ठरविले आहे.***

भविष्यामध्ये प्रशुल्क प्रस्ताव सादर करताना जलसंपदा विभागाने वरीलप्रमाणे त्रुटीबाबत (असल्यास) कारणमीमांसा व प्रस्तावित सुधारात्मक उपाय यासह प्रगती अहवाल प्रस्तुत केला पाहिजे. प्राधिकरणाला याबाबत प्रभावीपणे संनियंत्रण करता येणे शक्य व्हावे यासाठी प्रत्येक (मोठ्या व मध्यम) प्रकल्पाच्या बाबतीत मंडळनिहाय वर्षवार माहिती प्रति दलघमी साठविलेल्या पाण्यावर हंगामनिहाय सिंचित होणारे क्षेत्र इ. सादर करण्यात यावे.

**४. मत्ता व्यवस्थापन**

**यासंबंधी सविस्तर विवेचन २०१०-१३ च्या निकषामध्ये दिलेले आहे. ते खालीलप्रमाणे पुन्हा उधृत केले आहे -**

**अ) पाणी वापर संस्थांकडे हस्तांतरित न केलेल्या प्रणालीसाठी :**

सिंचन क्षेत्र व बिगर सिंचन क्षेत्रांसाठी मंजुर केलेल्या मापदंडाच्या आधारे जलसंपदा विभागाने प्रकल्पांच्या देखभाल दुरुस्ती कामासाठी आवश्यक असणाऱ्या वार्षिक निधीची छाननी केली पाहिजे आणि इतर पूरक घटकांसाठी (धरण, द्वारे, बारे इ.) आवश्यक असणाऱ्या निधीचा तसेच विशेष दुरुस्त्यांसाठी आवश्यक असणाऱ्या निधीचा अर्थसंकल्पात समावेश केला पाहिजे. अर्थसंकल्पास मंजुरी मिळाल्यानंतर प्रत्येक प्रकल्पास ठरवून दिलेल्या मानकानुसार आणि सिंचित व बिगर सिंचित क्षेत्रानुसार आवश्यक गरजे इतका निधी उपलबध करुन देण्याची आणि इतर कोणत्याही तदर्थ पध्दतीने खर्च न करण्याची जबाबदारी अधीक्षक अभियंता आणि जलसंपदा विभागाने घ्यावी. सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या कामांना प्राधान्यक्रम देऊन निधीचा वापर करण्यात यावा. याची माहिती प्राधिकरणास नियमितपणे उपलब्ध करुन द्यावी.

**ब) पाणीवापर संस्थांकडे हस्तांतरीत केलेल्या प्रणालींसाठी** :

याबाबत परिच्छेद १४.४ प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

# <u>परिशिष्ट - ६</u>

## <u>(परिच्छेद १४.१)</u>

## <u>कालवा प्रणालीतील वहन व्ययाचे निर्धारण</u>

१. राज्यातील सिंचनेतर तसेच सिंचन असा दोन्हींच्या विनियोगातील वहन व्ययाचे निर्धारण याचा पाणीवापराच्या एकंदरीत कार्यक्षमतेमध्ये सुधारणा आणि ठोक तसेच किरकोळ अशा दोन्ही पातळ्यांवर पाण्याचे प्रशुल्क याचेशी महत्वाचा संबंध आहे. सिंचनाच्या बाबतीत कालव्यातील पाझर, द्वारांमधून होणारी गळती, पाण्याची चोरी व पळवापळवी यामुळे प्रकल्प नियोजनानुसार सिंचित होणारे क्षेत्र कमी होते. त्याच बरोबर कालव्याच्या पुच्छ भागातील शेतकऱ्यांना पाणी वेळेवर देणे व पुरेशा प्रमाणात देणे अशा दोन्ही बाबतीतील पाणीपुरवठ्यातील हमीला बाधा पोहोचते. घरगुती पाणी पुरवठ्याच्या बाबतीत वहन व्यय, पाण्याची चोरी यासारख्या हिशोबक्षम नसणाऱ्या बाबींमुळे किरकोळ ग्राहकांपासून प्रशुल्काच्या स्वरुपात मिळणारा संभाव्य महसूल तर कमी होतोच पण त्याचबरोबर ग्राहकांना मिळणाऱ्या दरडोई पाणी उपलब्धतेतही घट होते ज्या परिणामी त्यांना प्रचंड दराने खाजगी स्त्रोतांकडून पूरक पाणीपुरवठा करुन घ्यावा लागतो.

कालवा प्रणालीतील वहन व्ययाच्या यथायोग्य निर्धारणासाठी जलसंपदा विभागाने अचूक मोजमाप करणे व पाण्याचा बिनचूक हिशोब ठेवणे यास योग्य महत्व दिले पाहिजे. शेतीस मोजून पाणी देण्यासाठी जलसंपदा विभागाने उघड्या वहन मार्गामध्ये मुख्य कालवा, शाखा कालवा, वितरिका व लघुवितरिकांच्या विमोचकांपासून सुयोग्य मापक यंत्रे बसविली पाहिजेत. ही यंत्रे योग्य पध्दतीने बसवून प्रमाणीकरण (calibration) केलेली असली पाहिजेत. संबंधित प्रकल्प अधिकाऱ्यांनी या यंत्रांच्या ठिकाणी नियतकालीकपणे मापनांची नोंद ठेवली पाहिजे; संबंधित प्रमाणित आलेखाद्वारे विसर्ग परिगणित करुन पाहिला पाहिजे आणि दोन मापक यंत्रांच्या मधील लांबीतील वहनव्यय निर्धारित केला पाहिजे. <u>राज्यातील प्रत्येक मोठ्या व मध्यम पाटबंधारे प्रकल्पातील वहन व्ययाचा प्रकल्पनिहाय अभ्यास प्रत्येक हंगामात प्रकल्पाच्या नियंत्रक अधीक्षक अभियंत्यांनी केला पाहिजे. लघु पाटबंधारे प्रकल्पांच्या बाबतीत प्रत्येक जिल्ह्यातील</u>

काही प्रकल्प (अभ्यासासाठी) घेतले पाहिजेत. जलसंपदा विभागाने ३ महिन्याच्या कालावधीत क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनार्थ वहन व्यय निर्धारित करण्यासाठी प्रमाणित नमुना विकसित करावा. या प्रकल्पनिहाय वहनव्ययाचे अभ्यासाचा सिंचन स्थितीदर्शक अहवालात स्वतंत्र प्रकरण म्हणून समावेश असावा.

२. सर्व शेतकऱ्यांना समन्यायी पध्दतीने पाणी देता येणे व लघु वितरिकांच्या मुखाशी देण्यात आलेल्या पाणी हक्काच्या परिमाणाचा योग्य हिशोब ठेवणे पाणीवापर संस्थेला शक्य व्हावे यासाठी शेतचाऱ्यांमध्ये V- नॉचेस सारखी मापन यंत्रे बसविण्यात यावीत.

३. राज्यातील सिंचन व सिंचनेतर वापरासाठी मापन यंत्रे बसविण्याची जबाबदारी क्षेत्रीय अधीक्षक अभियंत्यांची आहे तर त्यांचे प्रमाणीकरण (calibration), नियतकालिक तपासणी व कामगिरीचे मूल्यमापन याबाबतची जबाबदारी जलसंपदा विभागाने मुख्य अभियंता, महाराष्ट्र जलसंपत्ती विकास केंद्र, औरंगाबाद/ वाल्मी, औरंगाबाद/ मेरी, नाशिक यांच्या अधिपत्याखालील संघटनेवर अतिरिक्त म्हणून सोपवावी. सहा महिन्याच्या कालावधीत शासनाने ही जबाबदारी पार पाडण्यासाठी ह्या मुख्य अभियंत्यांच्या अधिपत्याखालील संघटना यथायोग्यपणे बळकट करावी. तीन महिन्याच्या कालावधीत जलसंपदा विभागाने ह्या प्रयोजनासाठी तपशीलवार मार्गदर्शक तत्वे वितरित करणे गरजेचे आहे. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जलसंपत्ती विकास केंद्र, औरंगाबाद यांनी ह्या बाबतीत त्यांच्या संघटनेच्या घडामोडींचा वार्षिक अहवाल प्राधिकरणाला सादर करीत जावा.

४. औद्योगिक व घरगुती प्रयोजनासाठीच्या पाणीवापराचे ठोक वापरकर्ते यांनी त्यांना पाणीपुरवठा होणाऱ्या स्थळांपाशी विसर्गात येणारी कमालीची दोलायमानता हाताळणे शक्य होण्यासाठी योग्य प्रमाणीकरण (calibration) केलेली प्रमाणित मोजमापके बसवावीत. अशा वापरकर्त्यांनी प्रक्रिया करुन परत सोडलेल्या पाण्याचा हिशोब लावण्यासाठी अशी मोजमापके वापरलेल्या पाण्याच्या विसर्गस्थळी देखील बसवावीत.

# महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण

९ वा मजला , सेंटर - १, वर्ल्ड ट्रेड सेंटर,  कफ परेड, मुंबई - ४०० ००५
दू : २२१५ २०१९ फॅ : २२१५ ३७६५ ईमेल : mwrra@mwrra.org